



भारताच्या स्वातंत्र्य चळवळीत भाग घेणाऱ्या दत्त आपटे यांनी, स्वातंत्र्याची चाहूल लागल्यानंतर विधायक कामाला वाहून घेतले. समाजवादाकडे त्यांचा निर्विवाद कल होता आणि ते लोकशाहीचे भक्त होते. त्यामुळेच भांडवलदारी आणि आपमतलबी नफेखोरीला विरोध असूनही, अमेरिकेतल्या लोकशाहीबद्दल त्यांना ममत्व होते.

भारतात स्वातंत्र्यानंतर राज्यघटना लागू झाली. राष्ट्राच्या जीवनात लोकशाही भिनली पाहिजे, म्हणून अमेरिकेच्या आजवरच्या अध्यक्षांच्या निवडीसंबंधाने त्यांची काही वैशिष्ट्ये कथा आपट्यांनी मराठीत आणल्या. अमेरिकेची संयुक्त संस्थाने मूळची इंग्लंडमधून तिकडे गेलेल्या लोकांनी वसविली. कोलंबसाने १४९७मध्ये अमेरिकेच्या भूमीवर पहिले पाऊल ठेवले, त्यानंतर सुमारे तीनशे वर्षांनी तिथे 'लोकशाही'ची स्थापना झाली. तरीही अमेरिकेची जी प्रगती दिसून येते ती गेल्या दीडशे दोनशे वर्षांतील आहे. त्या काळातील अध्यक्षांची राजवट त्या दृष्टीने जाणून घेण्यासाठी या कथा उपयुक्त ठरण्याजोग्या आहेत.

भारताला तर अनेक सहस्रकांचा अितिहास आहे, पण अमेरिकेसारखी राजकीय संघटनात्मक बांधणी भारतात झालेली नव्हती. लोकशाहीचे स्वरूप धारण करून दशकभराचा काळच झालेला होता. शुध्द लोकशाहीच्याच पायावरती नवस्वतंत्र भारत ध्येयाकडे वाटचाल करणार हे निश्चित होते. जे त्या मार्गाने गेले व जात आहेत त्यांचा मागोवा हेतू, या कथा सांगण्यात असणार हे उघड आहे..

१७८९ साली जॉर्ज वॉशिंग्टन अमेरिकेचा पहिला राष्ट्राध्यक्ष झाला, तेथपासून १९५३ साली आयसेनहॉवर सत्तेवर येईपर्यंतच्या सलग ३४ अध्यक्षांचे राज्यारोहण व सत्तात्याग यांच्या स्थितीचे रंजक वर्णन या पुस्तकात आहे.

*मूळचे पुस्तक मॉड व मिस्क पीटरसॅम यांनी १९५३मध्ये लिहिले, त्याचे हक्क सुप्रसिध्द मॅकमिलन कंपनीकडे होते. दत्त आपटे यांनी केलेला त्याचा मराठी अनुवाद, मुंबअीच्या के.भि.ढवळे यांच्या प्रकाशनसंस्थेच्या वतीने १९५८ साली सचित्र पुस्तकाच्या रूपात प्रसिध्द झाला. त्याच साली भारतात दशमान चलन आले, त्यामुळे पुस्तकाची किंमत 'रु.१.६०' अशी छापलेली आहे.*


| प्रकरण | पृष्ठ |
|---|---|
| १. जॉर्ज वॉशिंग्टन | ५६१ |
| २. जॉन अडॅम्स् | ५६३ |
| ३. थॉमस जेफर्सन | ५६४ |
| ४. जेम्स मॅडिसन | ५६५ |
| ५. जेम्स मनरो | ५६५ |
| ६. जॉन अडॅम | ५६६ |
| ७. अँड्र्यू जॅक्सन | ५६७ |
| ८. मार्टिन ब्युरेन | ५६९ |
| ९. विल्यम हॅरिसन | ५६९ |
| १०. जॉन टेलर | ५७० |
| ११. जेम्स के. पोलक | ५७१ |
| १२. झकारी टेलर | ५७२ |
| १३. मिलार्ड फिलमोर | ५७२ |
| १४. फ्रॅंक्लिन पिअर्स | ५७३ |
| १५. जेम्स बुकॅनन | ५७३ |
| १६. अब्राहम लिंकन | ५७४ |
| १७. अँड्र्यू जॉन्सन | ५७६ |

| प्रकरण | पृष्ठ |
|---|---|
| १८. युलॅसिस् ग्रँट | ५७७ |
| १९. रूथरफोर्ड हेस | ५७७ |
| २०. जेम्स गारफील्ड | ५७८ |
| २१. चेस्टर आर्थर | ५७९ |
| २२. क्लीव्हलंड | ५७९ |
| २३. बेंजामिन हॅरिसन | ५८० |
| २४. क्लीव्हलंड | ५८१ |
| २५. वुइल्यम् मॅकिन्ले | ५८१ |
| २६. थि. रूझवेल्ट | ५८२ |
| २७. वुइल्यम् टॅफ्ट | ५८३ |
| २८. विड्रो विल्सन | ५८४ |
| २९. वॉरन हार्डिंज | ५८५ |
| ३०. कॉलव्हिन कूलीज | ५८५ |
| ३१. हर्बर्ट हूवर | ५८६ |
| ३२. फ्रॅंक्लिन रूझवेल्ट | ५८७ |
| ३३. हॅरि ट्रूमन | ५८८ |
| ३४. ड्विट् आयसनहोअर | ५८९ |



# अमेरिकेच्या अध्यक्षांच्या गोष्टी

## जॉर्ज वॉशिंग्टन : अमेरिकेचा राष्ट्रपिता

१७८९ ते १७९९

तोफांची सरबत्ती झडली. ठाऽऽण् ठाऽऽण् करून घंटा वाजल्या. त्या अरुंद गल्लीत व घरांच्या छपराछपरांवरून जमलेल्या लोकांनी ''युनायटेड स्टेटस्‌चे अध्यक्ष जॉर्ज वॉशिंग्टन चिरायु होवोत!'' असा एकच जयघोष केला. १७८९मध्ये ही घटना घडली. न्यूयॉर्कमधील 'फेडरल हॉल' या इमारतीसमोरील अरुंद गल्लीत, अध्यक्षांचा जयघोष करणाऱ्या अमेरिकन नागरिकांची एकच झिम्मड उडाली होती.

इमारतीच्या सज्जात एक उमदी व उंच बांध्याची व्यक्ती खाली जमलेल्या उल्हासी जनसंमर्दाकडे सुहास्य मुद्रेने पाहात उभी होती. या व्यक्तीचा पोषाख गडद पिंगट रंगाचा होता. पायात सुरवारी पद्धतीची इजार होती व बुटांची पांढरी टोपणे चांदीची असल्याप्रमाणे झगमगत होती. मूळची कनवाळू मुद्रा, जनतेची मानवंदना मस्तक लववून स्वीकारताना वेळोवेळी गंभीर होत होती. अमेरिकेचे पहिले अध्यक्ष जॉर्ज वॉशिंग्टन यांनी अध्यक्षीय पद स्वीकारल्याचा शपथविधी नुकताच पुरा केला होता. तेरा अमेरिकन वसाहतींनी मिळून स्वातंत्र्ययुद्ध जिंकले होते व अमेरिका हे नवे संयुक्तराष्ट्र निर्माण केले होते. या नव्या राष्ट्राचे पुढारीपण एकमताने जॉर्ज वॉशिंग्टन यांना देण्यात आले होते.

व्हर्जिनिया या वसाहतीतील 'वेस्टमूर लँड' परगण्यात एका शेतावर वॉशिंग्टनचा जन्म झाला. या परगण्यात घनदाट अरण्यांची एकच गर्दी! शेतीखाली आलेली जमीन त्या मानाने फारच थोडी! लहानपणीच घोड्यावर बसणे व शिकार करणे या कलांत वॉशिंग्टनने चांगलेच प्रावीण्य संपादन केले.

पोरगा वाढला कसा उंचच्या उंच माडासारखा! पण पुस्तकात अगर अभ्यासात मन लागेल तर शपथ! वयाच्या अकराव्या वर्षीच बिचारा पितृसुखाला मुकला. पण आईच्या करारी मार्गदर्शनाखाली मुलगा निर्भय आणि स्वतंत्र बाण्याचा बनला. वयाच्या सोळाव्या वर्षीच तो फरडा मोजणीदार बनला. पुढील तीन वर्षे त्याने बंदूक आणि आखणीपेटी घेऊन भटकण्यात घालविली. ब्ल्यू माउंटन रिजच्या आसमंतातील जंगलमय प्रदेशाच्या कानाकोपऱ्याचे नकाशे याच कालात त्याने तयार केले. कष्ट कसे सोसावे, अनेक संकटांना तोंड कसे द्यावे याचे धडे घेतले. पर्वताचे खडे चढ ओलांडले. बर्फाप्रमाणे गार गार पाणी असलेल्या व पुराने सोंऽ सोंऽ करीत फोफावत जाणाऱ्या नद्या ओलांडल्या. धोकेबाज अशा मूळच्या ताम्रवर्णी रहिवाशांशी मुकाबला केला, पण आपले काम पुरे केल्याशिवाय सोडले नाही. आणि मग एक दिवस जॉर्ज वॉशिंग्टन व्हर्जिनियाच्या सैन्यात कर्नलच्या हुद्द्यावर नेमला गेला. त्याची उंची सहा फुटांपेक्षाही थोडी जास्तच होती. उत्तम घोडेस्वारी आणि निशाणबाजीत तरबेज

म्हणून त्याची ख्याती होती.

इंग्लिश सेनापती ब्रॅडॉकचा शरीररक्षक म्हणून तो सरहद्दीवर दाखल झाला. या ठिकाणी अमेरिकन वसाहतवाल्यांवर फ्रेंच व रेड इंडियन(अमेरिकेचे मूळ रहिवासी) वेळीअवेळी हल्ले चढवीत. वॉशिंग्टनला रेड इंडियनांची लढाईची पद्धत चांगलीच परिचित होती. आपले सर्व सैन्य एकत्रित करून ठेवण्याचा ब्रॅडॉकचा आग्रह होता. इंग्लिश शिपायांचे कोट गडद तांबड्या रंगाचे असल्याने, छपून बसलेल्या रेड इंडियनांना त्यांना अचूक टिपण्यास चांगलीच संधी मिळे. घोडे ठार झाले! त्याच्या गणवेशालाही गोळ्यांची भोके पडली, पण सुदैवाने त्याला मात्र काहीच इजा झाली नाही. इंग्लिश सैन्याचा संपूर्ण नाशच या प्रकरणात ओढवावयाचा, पण वॉशिंग्टनच्या कौशल्याने तो टळला. सर्व वसाहतीत त्याच्या धैर्याची व समयसूचकतेची प्रशंसा होऊ लागली. त्याच्या पुढारीपणाचा पाया या घटनेमधूनच घातला गेला.

एके दिवशी वसाहतवाल्यांनी इंग्लंडच्या राजाविरुद्ध बंड पुकारले. त्यांना स्वत:ची राजवट प्रस्थापित करण्याचा हक्क हवा होता. शेतकरी शिपाई बनले! आपल्या स्वातंत्र्यासाठी लढण्यास ते सज्ज झाले होते! त्यांनी जॉर्ज वॉशिंग्टनला आपले सेनापतीपद दिले! मॅसॅच्युसेट्समधील केंब्रिज येथे एका 'एम' वृक्षाखाली आपली तलवार उपसून वॉशिंग्टनने अमेरिकन सैन्याचे नेतृत्व पत्करले.

वॉशिंग्टन शांत होता, संयमी होता. निश्चय, निष्ठा आणि धैर्य यांचा तर तो मूर्तिमंत पुतळा होता. अमेरिकन स्वातंत्र्ययुद्धाच्या या दीर्घ कालात, कित्येक बिकट व निराशाजनक प्रसंग आले, पण त्याने आपल्या सैनिकांचा धीर खचू दिला नाही. विजयश्री खेचून आणली! अमेरिकेचे स्वातंत्र्य सिद्ध करून घेतले! आणि मग त्याने आपल्या सेनापतीपदाचा त्याग केला, आपल्या अधिकाऱ्यांचा व सैनिकांचा निरोप घेतला व व्हर्जिनियांतील आपल्या आवडत्या शेतीभातीकडे प्रयाण केले.

व्हर्नान पर्वतावर एक शेतकरी म्हणून कालक्रमणा करण्याची वॉशिंग्टनची मनीषा होती. पण नव्याने जन्माला आलेल्या त्याच्या राष्ट्राला खंद्या व शहाण्या माणसांची गरज होती. राष्ट्राने त्याला फिरून सार्वजनिक जीवनात आणले. फिलाडेल्फिया येथे भरलेल्या घटनापरिषदेचे अध्यक्षस्थान त्याला देण्यात आले. घटना तयार झाली; मंजूर झाली. आणि अमेरिकन जनतेच्या विश्वासाला प्रेमाला पात्र झालेल्या जॉर्ज वॉशिंग्टनला अमेरिकन जनतेने प्रथम अध्यक्षपदाचा मान दिला. लागोपाठ दोन वेळा अध्यक्षपदाचा मान त्याला मिळाला. सतत आठ वर्षे त्याने अध्यक्षपदाचा उपभोग घेतला. पण तिसऱ्या वेळी मात्र त्याने या गोष्टीला नकार दिला व सेवानिवृत्ती पत्करून व्हर्नान पर्वताकडे आपल्या शेतीवर प्रयाण केले.

वयाच्या एकविसाव्या वर्षीच त्याच्या सावत्र भावाकडून त्याला व्हर्नान पर्वतावरील या मालमत्तेचा वारसा मिळाला होता. पोटोमॅक नदीच्या लगतच हा जमीनजुमला होता. छोटेसे घर, तबेला, लोहारशाळा, गुलामांच्या झोपड्या असा सर्व साधासुधा सरंजाम येथे होता. आपल्या या शेतीची निगा राखण्यात वॉशिंग्टन सर्व काळ घालवी. रोटी, मध व चहा अशी सकाळची न्याहारी आटोपून तो घोड्यावर स्वार होई व शेतीकामाची देखरेख करीत, सूचना देत रानभर हिंडे. अध्यक्षपदाचा त्याग केल्यानंतर दोनच वर्षे वॉशिंग्टन हयात होता. आपल्या मृत्यूपत्रात, आपल्या कित्येक गुलामांना मुक्त करण्याची सूचना त्याने देऊन ठेविली होती.

अमेरिकेचे आपल्या या पहिल्या अध्यक्षावर नितांत प्रेम आहे. त्याने निर्माण केलेले, तो राष्ट्रपिता असलेले हे राष्ट्र आजच्या जगातील एक सामर्थ्यवान राष्ट्र बनले आहे.

●●●

## जॉन अडॅम्स : चिरकाल स्वातंत्र्य

१७९९ ते १८०१

जॉर्ज वॉशिंग्टनच्या अमदानीत पोटोमॅक नदीच्या किनाऱ्यावरील एक ठिकाण राजधानीसाठी पसंत करण्यात आले होते. या नव्या राजधानीची -वॉशिंग्टन शहराची उभारणी चालू असता फिलाडेल्फिया या शहरी तात्पुरती राजधानी ठेवण्यात आली होती. न्यू इंग्लंड या वसाहतीचा देशभक्त जॉन अडॅमस् याने फिलाडेल्फियातील 'स्वातंत्र्यगृहा'त अध्यक्षपदाची शपथ घेतली. जॉन बुटका पण मजबूत बांध्याचा होता. वॉशिंग्टनच्या नेतृत्वाखाली आठ वर्षे त्याने उपाध्यक्ष म्हणून काम केले होते. त्याचे सामर्थ्य आणि देशभक्ती अभेद्य होती.

मॅसॅचुसेट्समधील ब्रेनट्री हे चिमुकले गाव त्याचे जन्मठिकाण. आपल्या बापाच्या शेतीत तो राबे. धार काढणे, उन्हाळ्यात धान्य मळणे, हिवाळ्यात बर्फ झटकून काढणे, वगैरे कष्टाची कामे त्याला करावी लागत. रेड इंडियन या कुटुंबाशी दिलजमाई ठेवून शेजारी राहात. जॉन त्यांच्या राहुट्यात घरच्याप्रमाणे वावरे.

वयाच्या पंधराव्या वर्षी त्याने हारवर्डच्या विश्वविद्यालयात प्रवेश केला. पदवीपरीक्षा दिल्यानंतर त्याने काही काळ शिक्षकाचा पेशा पत्करला व नंतर बोस्टन शहरी वकिली चालू केली. अमेरिकन वसाहतवाले व हुजूर मनोवृत्तीचे इंग्लंड धार्जिणे यांच्यातील तेढ या काळात निकराला येऊ पाहात होती. देशभक्तीने भारावलेल्या जॉन अडॅम्सचा अमेरिकन वसाहतवाल्यांच्या संपूर्ण स्वातंत्र्यावर पुरेपूर विश्वास होता. मायदेशाच्या, इंग्लंडच्या विरोधी जाऊन हे पाऊल टाकण्याचे धाडस कित्येक मी मी म्हणणाऱ्यांना होत नव्हते. पण अडॅम्स बेडर होता! निर्भय होता! त्याने राष्ट्रसभेपुढे ज्वलज्जहाल भाषणे करून संपूर्ण स्वातंत्र्याचा जाहीरनामा मंजूर करण्याची तिला गळ घातली! त्याच्या सामर्थ्यवान शब्दांनी राष्ट्रसभा भारावली व तिने ४ जुलै १७७६ मध्ये संपूर्ण स्वातंत्र्याचा ठराव मंजूर केला. अमेरिकेच्या इतिहासातील हा दिवस अत्यंत महत्वाचा आहे.

स्वातंत्र्ययुद्धकालात अमेरिकेचा प्रतिनिधी म्हणून अडॅम्सची फ्रान्सला रवानगी करण्यात आली. युद्धोत्तर कालात त्याच्याकडे अत्यंत अवघड कामगिरी आली. इंग्लंडचा राजा तिसरा जॉर्ज याच्यापुढे तो अमेरिकेचा इंग्लंडातील प्रतिनिधी म्हणून हजर झाला. तिसरा जॉर्ज एक वेळ अमेरिकन वसाहतींचाही राजाच होता. त्याच्याबरोबर त्याची पत्नी व मुलगी या दरबारात उपस्थित होत्या.

जॉन अडॅम्स् अध्यक्षपदी असतानाच अमेरिकेची राजधानी वॉशिंग्टनला आली. तेथील अध्यक्षीय भवनात राहाण्याचा प्रथम मान जॉन अडॅम्सला व त्याच्या पत्नीला मिळाला. ''अध्यक्षीय भवन'' उघडे बोडके उभे होते. त्याला ना कुंपण, ना बाग! मोठी भयाण जागा वाटे ती! ॲबिगेलने एकदा माहेरी लिहिले, ''येथील या प्रचंड दिवाणखान्यात सामानसुमान नाही, टेबलखुर्च्या नाहीत. मी कपडे वाळत घालण्यासाठी त्याचा उपयोग करते.''

जॉन अडॅम्सने आपल्या निवासस्थानाला पुढील धन्यवाद दिले आहेत : 'प्रामाणिक व शहाणी माणसेच फक्त या छपराखाली नांदोत!' जॉन अडॅम्सची कारकीर्द फारशी लोकप्रिय झाली नाही. या चार वर्षांच्या काळात सरकार दरबारातच असंतोष माजला आणि त्यामुळेच फिरून तो निवडून येऊ शकला नाही. तो स्वत:ही बराचसा निराश, हताश झाला होता. नव्या अध्यक्षाच्या 'अधिकारसमर्पण' समारंभासही तो उपस्थित राहिला नाही. समारंभाच्या दिवशीच पहाटे अध्यक्षीय भवन सोडून तो न्यू इंग्लंडमधील आपल्या घरी निघून गेला.

मरण्यापूर्वी एक वर्ष आधी, आपला मुलगा क्विन्सी अडॅम्स् अमेरिकेचा अध्यक्ष झालेला पाहाण्याचे भाग्य त्याला मिळाले. जॉन अडॅमस् ४ जुलै १८२६ ला मरण पावला. अमेरिकन स्वातंत्र्याचा ठराव त्याने ज्या दिवशी मंजूर करून घेतला, तोच हा ४ जुलैचा दिवस! त्या दिवसाच्या पन्नासाव्या वाढदिवशी तो मरण पावला. या दिवसाच्या एका वाढदिवशी जॉनला 'अभिष्टचिंतना'चा पहिला पेला उचलण्याचा मान दिला गेला असता तो नव्वद वर्षांचा देशभक्त अभीष्टचिंतीताना म्हणाला, 'चिरकाल स्वातंत्र्य!'

'चिरकाल स्वातंत्र्य' हे त्याच्या जीवनाचे ध्येयवाक्य होते.

●●●

## थॉमस जेफर्सन : स्वातंत्र्याच्या जाहीरनाम्याचा जनक

१८०१ ते १८०९

जॉन अडॅम्सनंतर अध्यक्ष म्हणून थॉमस जेफर्सन याची निवड करण्यात आली. तो एका नव्या पक्षाचा पुढारी होता. राजेशाहीप्रमाणे एखाद्या व्यक्तीच्या हाती राज्यकारभाराची सूत्रे केंद्रित न राहाता सत्ता जनतेच्या हाती जास्तीत जास्त कशी राहील हे पाहाण्याकडे या पक्षाचा कल होता. या पक्षाचे नाव त्यावेळी 'रिपब्लिकन पक्ष' असे होते पण हाच पक्ष पुढे 'डेमॉक्रॅटिक' किंवा 'लोकशाही' पक्ष म्हणून ओळखला जाऊ लागला.

जेफर्सन उंच बांध्याचा व नाजूक प्रकृतीचा मनुष्य होता. त्याच्या केसांना तांबूस छटा होती. त्याचा पोशाख साधाच असे. अध्यक्षीय पद स्वीकारण्यासाठी तो आला तो मुळी चालत, चिखल माती तुडवीत! पूर्वीचे अध्यक्ष सहा घोड्यांच्या गाडीतून हिंडत तर हा अध्यक्ष नुसत्याच घोड्यावर बसून रपेट करी! अध्यक्षाचे घर सदा सर्वकाळ कोणालाही खुले असे व भोजनाच्या वेळी तो गोल मेज वापरी, म्हणजे सर्वांनाच समान भूमिकेवरून एकत्र बसता येई.

व्हर्जिनियामधील 'अल्बेमरेल' या परगण्यात जेफर्सनचा जन्म झाला. लहानपणापासून आपल्या शेतीभातीवर घोड्यावरून रपेट मारून येण्यात त्याला आनंद वाटे. त्याच्या बापाने जंगल तोडून व साफसूफ करून भलीमोठी शेतीवाडी स्वकष्टाने निर्माण केली होती. संगीत व पुस्तके यांची आवड त्याने पित्यापासूनच घेतली होती. 'विल्यम्सबर्ग' येथील विश्वविद्यालयात कला, वाङ्मय, शास्त्र व तत्त्वज्ञान या विषयांची त्याला गोडी लागली. वयाच्या चोविसाव्या वर्षीच तो फर्डा वकील म्हणून ओळखला जाऊ लागला. जेफर्सन बुद्धिमान व अभ्यासू वृत्तीचा होता. मुत्सद्दी म्हणून त्याच्या नावाचा लौकिक होण्यास फारसा वेळ लागला नाही.

राजकीय द्रष्टा म्हणून जेफर्सनचा लौकिक चिरकाल टिकणारा आहे. 'सर्व लोकांना समान हक्क' या राजकीय समतेचा तो पुरस्कर्ता होता. तो बोलण्यात जरा कमकुवत होता पण ती उणीव त्याच्या प्रभावी लेखणीने भरून काढली होती. 'स्वातंत्र्याच्या जाहीरनाम्याचे' प्रभावी लिखाण त्याच्या हातचे होते! बेंजामिन फ्रँकलिन व जॉन अडॅम्स यांनी त्यात किरकोळ दुरुस्त्या फार तर केल्या असतील. आज वॉशिंग्टन येथे, अत्यंत महत्वाचा राजकीय कागद म्हणून खुद्द जेफर्सनच्या सुंदर व सुवाच्य हस्ताक्षरांतील या जाहीरनाम्याची मूळ प्रत संग्रहित करून ठेवण्यात आलेली आहे. या प्रतीच्या लिखाणासाठी ज्या उतरत्या मेजाचा उपयोग त्याने केला ते त्याने स्वत:च तयार केले होते.

वॉशिंग्टनच्या अमदानीत तो कार्यवाह म्हणून काम करीत होता, तर अडॅम्सच्या कारकिर्दीत तो उपाध्यक्षपदी होता. आपल्या कारकीर्दीत त्याने 'ल्युसिआना ही फ्रेंच वसाहत विकत घेऊन आपल्या राष्ट्राचे क्षेत्रफळ दुपटीने वाढविले. अमेरिकेची पश्चिम हद्द पॅसिफिकच्या किनाऱ्याला नेऊन भिडविली.

सतत आठ वर्षे अध्यक्षपद उपभोगल्यानंतर, तिसऱ्या खेपेस त्याने सेवानिवृत्ती पत्करली. पर्वतमाथ्यावरील आपल्या घरात त्याने आवडत्या पुस्तकांचा, चित्रांचा व अनेक वस्तूंचा संग्रह केला होता. सेवानिवृत्ती पत्करल्यावरही तो व्हर्जिनिया विश्वविद्यालयाच्या कारभारात लक्ष घाली. त्याचा पायाच मुळी त्याने घातला होता. आपली मुलगी व नातवंडे यांचा परिवार मरेपर्यंत त्याच्या सभोवती होता. वयाच्या ८३व्या वर्षी तो मरण पावला.

४ जुलै १८२६ या दिवशी मरण्यापूर्वी जॉन अडॅम्स म्हणाला होता, 'थॉमस जेफर्सन अद्यापि हयात आहे....!' पण त्याने हे उद्‌गार काढण्याच्या आधी थोडाच वेळ जेफर्सनचे देहावसान झाले होते! जेफर्सनने आपल्या समाधीवर पुढील साधा लेख बसविण्याची मनीषा व्यक्त केली होती.

''स्वातंत्र्याच्या जाहीरनाम्याचा व व्हर्जिनियाच्या 'धर्मस्वातंत्र्य' विधेयकाचा 'जनक', व्हर्जिनिया विद्यापीठाचा संस्थापक, थॉमस जेफर्सन याला येथे पुरण्यात आले आहे!''

● ● ●

## जेम्स मॅडिसन : घटनेचा जनक
१८०९ ते १८१७

जेफर्सनच्या कारकिर्दीत राज्य-कार्यवाह म्हणून सतत आठ वर्षे काम करणारा विद्वान, जेम्स मॅडिसन, त्याच्यानंतर अमेरिकेचा चौथा अध्यक्ष झाला. त्याची वागणूक सौम्य व आवाज मृदू होता. बुद्धी तीक्ष्ण व सर्वगामी होती.

मॅडिसनचा जन्म व्हर्जिनियातील 'पोर्ट कॉनवे' या ठिकाणी झाला. त्याने इतिहास व राज्यशास्त्र यांचा अभ्यास केला. जेफर्सनच्या मार्गदर्शनाखाली त्याने कायद्याचाही अभ्यास केला. तो पुढे त्याचा जीवश्चकंठश्च मित्र बनलाच पण जेफर्सनच्या लोकशाहीवरील श्रद्धेचा वारसाही त्याने मिळवला.

वसाहती स्वातंत्र्ययुद्धात गुंतल्या असता, लष्करी नोकरीसाठी अयोग्य ठरलेला मॅडिसन, आपल्या बुद्धिमत्तेच्या जोरावर राष्ट्राचे इतर प्रश्न सोडविण्यासाठी झटत होता. घटना समितीचा तो एक प्रमुख सभासद होता व त्याच्या कित्येक कल्पनांचा समावेश घटनेत करण्यात आल्याने त्यालाच 'अमेरिकन घटनेचे' जनकत्व देण्यात येते.

मॅडिसनला आपल्या कारकिर्दीत अनेक गंभीर प्रश्नांना तोंड द्यावे लागले. रेड इंडियन लोक जागोजाग उठावणी करीत होते. इंग्लंडशी दुसऱ्या युद्धाची भीती निर्माण झाली होती. समुद्रावर इंग्लंड व फ्रान्स यांनी अमेरिकन जहाजांची लूटमार चालविली होती. ब्रिटिश लोकांनी अमेरिकन जहाजे गाठून त्यांवरील खलाश्यांचा ते आपले नागरिक आहेत असा दावा करून त्यांचा कबजा घेण्याचा सपाटा चालू केला. सौम्य स्वभावाच्या मॅडिसनने हे सर्व प्रश्न शांततेने सुटावेत म्हणून खटपट केली, पण शेवटी अमेरिकेला शस्त्रबलाने समुद्रावरील आपले हक्क प्रस्थापित करून घ्यावे लागले.

इंग्लिश आरमाराने 'चेस्पीक'च्या उपसागरामधून अमेरिकन भूमीवर सेना उतरविण्यात यश मिळविले. या सैन्याने वॉशिंग्टन शहराचा कबजा घेऊन कित्येक सरकारी इमारती पेटवून दिल्या. शहर सोडताना मॅडिसनच्या पत्नीने अध्यक्षीय प्रासादामधील 'जॉर्ज वॉशिंग्टनची' भव्य तसबीर इंग्लिशांच्या हाती लागू नये म्हणून तिथून हलविली. आज ही तसबीर अध्यक्षीय निवासस्थानी आहे.

ब्रिटिशांना काही दिवसांनी 'वॉशिंग्टन' खाली करावे लागले. जेम्स मॅडिसनने लागोपाठ दोन वेळा अध्यक्षपद उपभोगिले. पण ही आठ वर्षे मोठी आणीबाणीची व तापत्रयाची गेली.

'माँटपिलर' या ठिकाणी तो सेवानिवृत्तीनंतर राहात असे. येथे तो सदासर्वकाळ लेखन-वाचनात रमलेला असे. अध्यक्षीय कारकिर्दीपेक्षाही, अध्यक्ष नसताना त्याने पार पाडलेली कायदेकानू विषयक कामगिरीच लोकांच्या स्मरणात चिरस्थायी आहे.

●●●

## जेम्स मनरो : त्रिकोणी टोपी घालणारा अखेरचा अध्यक्ष
१८१७ ते १८२५

१८१७ पर्यंत ब्रिटिशांनी उध्वस्त केलेले वॉशिंग्टन हे राजधानीचे शहर नीटनेटके झाले नव्हते. तात्पुरत्या उभारण्यात आलेल्या एका व्यासपीठावर अमेरिकेच्या पाचव्या अध्यक्षाला - मनरोला आपला शपथविधी उरकावा लागला.

मनरो हा बराच कालपर्यंत देशसेवा केलेला कसलेला मुत्सद्दी होता. तो मोठ्या तीक्ष्ण बुद्धिमत्तेचा होता असे नाही, पण प्रामाणिक व विश्वासार्ह मात्र जरूर होता. तो उंच असून त्याच्या डोळ्यातील निळसर छटा विलोभनीय होती. खांदे किंचित् पुढे झुकलेले होते. चेहेऱ्यावर सुरकुत्या

होत्या! अध्यक्षीय भवनाची डागडुजी करण्यात आली. त्याची पत्नी व मुलगी इंग्लंड फ्रान्सच्या दरबारी वावरलेल्या होत्या. त्यांनी अध्यक्षीय भवनाला नवी शिस्त लावली. त्यांचा पाहुण्यांच्या पोषाखावर कटाक्ष असे व अलबत्या गलबत्याची भेटही न घेण्याची त्यांची शिस्त असे!

व्हर्जिनियातील 'वेस्ट मुरलँड' परगण्यात मनरोचा जन्म झाला होता. मनरोच्या खाडीनजीक असलेल्या छोट्याशा शेतीभातीवर त्याचे घर होते. त्याच्या बालपणाची फारशी माहिती उपलब्ध नाही. वयाच्या अठराव्या वर्षी तो 'विल्यम्स् अँड मेरी' या विद्यापीठात शिकत होता. पण स्वातंत्र्ययुद्ध सुरू झाल्याने मनरोने अभ्यासाला रामराम ठोकला व वॉशिंग्टनच्या नेतृत्वाखाली शिपाईपेशा पत्करला. युद्धात गोळी लागून तो जखमी झाला. युद्धानंतर जेफर्सनच्या मार्गदर्शनाखाली त्याने कायद्याचा अभ्यास चालू केला. जेफर्सनच्या विचारसरणीचा पगडा मॅडिसनप्रमाणेच मनरोवरही बसला होता. हे तिघेही 'जानी दोस्त' बनले होते.

मनरोच्या आयुष्याचा फार मोठा भाग लोककार्यांत खर्च पडलेला आहे. वयाच्या पंचविसाव्या वर्षी तो 'घटना-सभेचा' सभासद होता. फ्रान्समध्ये अमेरिकन राष्ट्रप्रतिनिधी म्हणून त्याची नेमणूक झाली होती; पण फ्रेंच क्रांतिकारकांना सहानुभूती दाखविल्याबद्दल त्याला परत बोलविण्यात आले. दोन वेळा व्हर्जिनियाचे गव्हर्नर (राज्यपाल)पद त्याला देण्यात आले. १८१२च्या युद्धात राज्यकार्यवाह व युद्धकार्यवाह अशा दुहेरी जबाबदाऱ्या त्याला सांभाळाव्या लागल्या. मनरो अध्यक्ष झाला त्यावेळी अमेरिका एका उज्वल कालखंडात प्रवेश करीत होती. युद्धातून ती मोकळी झाली होती. जनतेत विश्वास निर्माण झाला होता. लोकांची चलती चालू झाली होती. त्यांनी पुढे पुढे घुसून नव्या नव्या वसाहती प्रस्थापित करण्याचा व संपत्तीचा नवी कोठारे हस्तगत करण्याचा धुमधडाका चालू केला होता. मनरोने कारभारासाठी शहाण्या माणसांची निवड केली. दुसऱ्या खेपेस त्याची निवड झाली तेव्हा त्याला विरोधी असे फक्त एकच मत नमूद झाले होते! त्याने कित्येक दूरगामी निर्णय आपल्या कारकिर्दीत केले. स्पेनकडून 'फ्लॉरिडा' हा जंगलांनी व दलदलींनी व्यापलेला मुलुख विकत घेण्यात आला. 'मिसुरी तडजोड' ही योजना अमेरिकन प्रतिनिधी सभेने (काँग्रेस) मंजूर केली. या योजनेने दरसाल दक्षिणेकडील गुलामांची पद्धत रूढ ठेविलेल्या एका वसाहतीला व उत्तरेकडील ही पद्धत नसलेल्या एका वसाहतीला संयुक्त राष्ट्रघटनेत सामील होण्याची मुभा देण्यात आली. याच वेळी मनरोने आपले 'मनरो तत्त्व' या नावाने ओळखले जाणारे 'धोरण' जाहीर केले. 'युरोपियन राष्ट्रांनी अमेरिका खंडात जास्ती मुलुख मिळविण्याच्या भरीला पडू नये, त्याचप्रमाणे अमेरिकेनेही या राष्ट्रांच्या प्रश्नात हात घालू नये.' हे ते धोरण होय.

सेवानिवृत्ती पत्करताना मनरोजवळ पैसा असा काहीच नव्हता! पत्नीच्या निधनानंतर त्याला आपली व्हर्जिनियामधील मालमत्ता विकावी लागली. न्यूयॉर्क शहरात, पुढे तो आपल्या मुलाकडे राहात असे. तो वयाच्या ७३व्या वर्षी मरण पावला.

तिकोनी 'कोंबडा' छाप टोपी वापरणारा हा शेवटचा अमेरिकन अध्यक्ष!

●●●

## जॉन क्विन्सी अडॅम्स : 'बोलका म्हातारा'

१८२५ ते १८२९

जेफर्सननंतर जॉन क्विन्सी अडॅम्स याची अध्यक्षपदी निवड झाली. पण ही निवड समाधानकारक नव्हती. अध्यक्षपदासाठी उभे असलेल्या उमेदवारांत कोणालाच बहुमत मिळाले नाही व शेवटी प्रतिनिधीगृहाने अध्यक्षपदाची निवड करून अडॅम्सला ती जागा दिली. अमेरिकेचा दुसरा अध्यक्ष जॉन अडॅम्सचा हा मुलगा!

लोकसभेतील कित्येक लोकांना ही निवड तितकीशी पसंत नसल्याने प्रथमपासून त्याला कडव्या विरोधकांना

तोंड देण्याची पाळी आली. अडॅम्स् प्रामाणिक होता, अनुभवी मुत्सद्दी होता व वागणुकीने पण सरळ होता. त्याची ही चार वर्षांची कारकिर्द मोठी आणीबाणीची झाली.

मॅसॅचुसेट्समधील क्विन्सी येथे त्यांचा जन्म झाला. तो वयाने आठ वर्षांचा असता शेजारच्या टेकडीवर चढून 'बंकर हिल' या ठिकाणी चाललेली लढाईची धामधूम पाहात बसे. त्याच्या वहीत त्याने या प्रसंगाची रेखाटलेली चित्रे पाहावयास मिळत. त्यात जहाजे असत, शिपाई, तोफा, बंदुका असत! वयाच्या दहाव्या वर्षी तो बापाबरोबर फ्रान्सला गेला. तेथील मुत्सद्द्यांशी, त्याच्या बापाने 'अमेरिकन स्वातंत्र्या'बाबत केलेल्या चर्चा त्याला ऐकावयास मिळत.

परत आल्यानंतर बोस्टन येथे त्याने आपला विश्वविद्यालयीन अभ्यासक्रम पुरा केला. त्याने वकिली चालू केली आणि वॉशिंग्टनने त्याची लायकी ओळखून त्याला अमेरिकेचा प्रतिनिधी म्हणून हॉलंडला रवाना केले. पुढे कित्येक दिवस, निरनिराळ्या युरोपियन राष्ट्रांमधून त्याने अमेरिकेचा वकील म्हणून काम केले. मनरोच्या कारकिर्दीत 'कार्यवाह' म्हणून काम करीत असताना 'मनरो तत्त्वांची' घडण घडवून आणण्याची कामगिरी त्यानेच केली. अध्यक्षपदी असता तो अगदी साधेपणाने वागे. पहाटे लवकर उठून तो कित्येक मैल पायी फिरावयास जाई. येताना पोटोमॅक नदीत पोहून येण्यासही कमी करीत नसे. निवासस्थानी आल्यानंतर वाटल्यास काही वेळ शेकोटीपाशी बसे. न्याहारीपूर्वी बायबलमधील काही उतारे वाचण्याचाही त्याचा परिपाठ होता. नंतर भेटावयास येणाऱ्या लोकांच्या गाठीभेटी घेण्यात तो वेळ घालवी. जेवणानंतर मात्र एकदा तो कामास बसला की मध्यरात्रीपर्यंत जागचा हलत नसे! त्याची कित्येक धोरणे लोकांना जुलमी, अगर जुनी वाटत! कला व शास्त्रे यांच्या प्रगतीसाठी त्याने खटपटी केल्या. राजकीय कर्जफेडीसाठी, वशिल्याच्या लोकांना मोक्याच्या नोकऱ्या देण्याची पद्धत त्याने काटेकोरपणाने बंद केली. त्याने कोणत्याच पक्षाची निष्ठा बाळगली नाही. त्याला जे रास्त दिसेल तेच करण्याचा चंग त्याने बांधल्याने कोणत्याच पक्षाने त्याला पाठिंबा दिला नाही व त्यामुळे स्वाभाविकच तो दुसऱ्यांदा निवडून येऊ शकला नाही.

पण एवढ्याने तो दबला मात्र नाही! आपल्या धोरणांचा पाठपुरावा करण्यासाठी प्रतिनिधीगृहात तो सदैव खडा असे. अध्यक्षपदाचा मान उपभोगल्यानंतर एक सामान्य सभासद म्हणून गृहात बसण्यात त्याने कमीपणा मानला नाही. कित्येक दिवस तो प्रतिनिधीगृहाचा सभासद म्हणून आपल्या प्रतिपक्षाशी सामना देत होता. त्याच्या या चिकाटीमुळेच 'बोलका म्हातारा' असा किताब त्याला मिळाला! सभापतीच्या खोलीत बसला असता एक दिवस अचानक त्याला अर्धांगाचा झटका आला; त्यावेळी त्याचे वय ८१ वर्षांचे होते. पुढे दोन वर्षांनी तो मरण पावला.

सर्व उत्तमोत्तम गोष्टी आपल्या देशात असाव्यात अशी जॉन क्विन्सी अडॅम्सची इच्छा होती व याच भावनेने तो काम करीत असे.

●●●

## अँड्र्यू जॅक्सन : बुढ्ढी बाभळ!
१८२९ ते १८३७

अमेरिकेची वाढ झपाट्याने होत होती. कित्येक नवी संस्थाने 'संयुक्त संस्थानात' येऊन मिळत होती. शहरांची संख्या वाढत होती. शेतकरी, कामगार व पश्चिमेकडील वसाहतवाले यांना राज्यकारभारात भाग घेण्याची इच्छा निर्माण झाली होती. त्यांना राजकीय हक्क हवे होते. या लोकांना आपल्यासारखा साधासुधा, जनतेत मिसळणारा अध्यक्ष हवा होता. त्यांनी अँड्र्यू जॅकसनची अध्यक्षपदी निवड केली. जॅक्सन कसलेला योद्धा होता. तांबड्या हिंदी लोकांशी सामना देण्यात व त्यांना मोडून

काढण्यात त्याने अपूर्व यश संपादन केले होते. थॉमस् जेफर्सनने निर्माण केलेल्या मूळच्या रिपब्लिकन पण आता डेमोक्रॅट म्हणून ओळखल्या जाणाऱ्या पक्षाचा तो सभासद होता. सर्वसामान्य लोकांना या निवडीमुळे आपला माणूस अध्यक्ष झाला असे वाटले. आपल्या वीराला पाहाण्यासाठी वॉशिंग्टन शहरात त्यांनी एकच गर्दी केली. दुरून दुरून लोक आले.

शपथविधी आटोपून उंच, कडवा, निळ्या डोळ्यांचा जॅक्सन् घोड्यावरून अध्यक्षीय भवनाकडे आला. तेथे त्याच्या स्वागतासाठी बडे बडे अधिकारी, मुत्सद्दी हजर होते. पण त्याच्या पाठोपाठ अनेक आडदांडांचा घोळका 'आपल्या वीराच्या' पाठोपाठ भवनात शिरला! आणि उत्साहाच्या भरात त्यांनी तावदाने, काचेची भांडी, चिनीमातीच्या कपबशा यांचा खळाखळ चक्काचूर केला! गालिचे, मखमली खुर्च्या यांची आपल्या चिखलाने बरबटलेल्या बुटांनी अक्षरश: धूळदाण केली.

अध्यक्षपद स्वीकारण्यापूर्वी थोडेच दिवस जॅक्सनची प्रिय पत्नी निवर्तली असल्याने सर्व समारंभ त्याने अत्यंत उदासपणाने पार पाडला. 'दक्षिण कॅरोलिया' वसाहतीतील वॅक्सहॉ या खेड्यात जॅक्सनचा जन्म एका झोपडीत झाला. परदेशात जन्मलेल्या 'माता-पित्या'चा मुलगा अध्यक्ष होण्याचा प्रसंग हा पहिलाच! स्कॉटलंड व आयर्लंड या युरोपियन देशांतून आलेल्या 'माता-पित्याचा' हा मुलगा. अँड्र्यू जॅक्सन्‌चा जन्म त्याच्या पित्याच्या मृत्यूनंतर काही दिवसांनी झाला. जंगलमय प्रदेशात मुलाची उस्तवार करण्यासाठी त्याच्या आईला अतोनात कष्ट पडले.

अमेरिकन राज्यक्रांतीने वॅक्सहॉच्या लोकांत घबराट निर्माण झाला. एक पोऱ्या असूनही जॅक्सनला कैद व्हावे लागले. एका ब्रिटिश अधिकाऱ्याचे बूट पुसण्यास नकार दिल्याबद्दल, त्या अधिकाऱ्याने चिडून त्याच्या गालावर दिलेल्या तरवारीच्या फटकाऱ्याचा वण त्या ठिकाणी कायम राहिला!

आई व भावंडे ही पुढे मरून गेली आणि वयाच्या पंधराव्या वर्षी अँड्र्यूला जगात आपले असे कोणीच राहिले नाही. पोराला कोणीच आडपते दडपते न राहिल्याने त्याच्या स्वभावाला एकप्रकारे वादळी वळण लागले. आपली तीव्र बुद्धी व कणखर मनगट यांच्या जोरावर त्याने आपला मार्ग काढण्यास सुरुवात केली. कोंबड्यांच्या झुंजी व घोड्यांच्या शर्यती येथे हे पोर हटकून हजर असावयाचे! पण अभ्यासात कधी कुचराई असावयाची नाही. अशा धडपडीतून त्याने आपला कायद्याचा अभ्यास पुरा केला.

टेन्सी सरहद्दीवर, वकील व फिरता न्यायाधीश म्हणून त्याने बरेच दिवस काम केले. रानटी मुलखात ठिकठिकाणी फिरत्या न्यायालयाबरोबर त्याला हिंडावे लागे. त्याच्या ज्वलज्जहाल स्वभावामुळे तो वारंवार भांडणात सापडे! द्वंद्वयुद्धाचे प्रसंग ओढवून घेई. टेन्सी सैन्यात दाखल झाल्यानंतर तांबड्या हिंदी लोकांची बंडे मोडून काढण्याची कामगिरी त्याला देण्यात आली. तो आपल्या सैनिकांना घेऊन त्या खडतर मुलखामधून मजला मारी! त्यांच्या बरोबरीने त्यांच्या खडतर जीवनात समरस होई! त्याचे लोक त्याच्या टणकपणावर खूश होऊन त्याला 'बुद्धी बाभळ' म्हणून ओळखीत. एका बेवारशी हिंदी मुलाचा प्रतिपाळ त्याने आपल्या मुलाप्रमाणे केला होता. १८१२मध्ये न्यू ऑर्लीन्स येथे त्याने ब्रिटिशांविरुद्ध संपूर्ण विजय मिळविला आणि त्याची कीर्ती एकदम सर्व देशात पसरली.

'टेन्सी'चा तो पहिला लोकप्रतिनिधी म्हणून व फ्लॉरिडाचा राज्यपाल म्हणून, त्याने राजकीय जीवनाचा बराच अनुभव मिळविला होता. राजकारणात मात्र त्याला फारसे गम्य नव्हते. प्रथम त्याने क्विन्सी अडॅम्स् याच्या विरुद्ध अध्यक्षपदासाठी सामना दिला, पण कोणालाच बहुमत न मिळाल्याने प्रतिनिधीगृहाने अडॅम्सची निवड केली व जॅकसनला चार वर्षे स्वस्थ बसावे लागले. पुढील खेपेस मात्र जॅकसन प्रचंड बहुमताने निवडून आला.

त्याने खंबीरपणाने अधिकार चालविला! यामुळेच त्याची कारकिर्द 'अँड्र्यू राजाची' कारकिर्द म्हणून ओळखली जाते. सरकारात त्याने आपल्या अनुयायांची भरती केली. 'संयुक्त संस्थान पेढी'मध्ये आतापर्यंत सरकारी पैसा ठेवण्यात येई पण या पेढीवर त्याचा विश्वास नसल्याने त्याने तीमधून सरकारी ठेव काढून घेतली व ही पेढी बुडाली! जुन्या लढाया व राजकीय जीवनाची झटापट यामुळे ही 'बुद्धी बाभळ' जीर्ण झाली. अध्यक्षीय पदाची दुसरी चार वर्षे झाल्यानंतर निवृत्ती पत्करून तो 'नॅशव्हील' येथे आपल्या शेतीवर राहाण्यासाठी गेला.

या लढवय्याचा द्वेष अनेक लोक करीत, पण त्याच्यावर नितांत प्रेम करणारे लोकही तितकेच होते!

●●●

## 'मार्टिन व्हॉन ब्युरेन' : 'तांबडा कोल्हा'

१८३७ ते १८४१

आपले अध्यक्षपद सोडण्यापूर्वी अँड्य्रू जॅक्सनने आपला अनुयायी व्हॉन ब्युरेन आपली जागा घेण्यासाठी निवडून यावा म्हणून चंग बांधला होता. 'छोटा व्हॉन' म्हणून जरी ब्युरेन ओळखला जात असला तरी त्याची बुद्धी मोठी चपलख होती. राजकारणाचे डाव तो मोठ्या सफाईने खेळे. आपल्या हुशारीने व राजकीय कौशल्याने त्याने 'तांबडा कोल्हा' हे टोपण नाव स्वत:साठी मिळवून ठेविले होते.

जॅक्सनप्रमाणेच त्याने जगात स्वत:चा मार्ग काढला होता. त्याची वागणूक दरबारी असे. कपड्याचा त्याला विलक्षण शौक होता, त्यामुळे कित्येक लोक त्याला 'भंपकराव' समजत. अध्यक्षपद मिळण्यापूर्वी बराच काळ त्याने निरनिराळ्या राजकीय महत्वाच्या जागांवर कामे केली होती.

अल्बेनीजवळ हडसन नदीच्या काठी असलेल्या किंडरहुक या खेड्यात त्याचा जन्म झाला होता. त्याचे माता-पिता डच होते. त्याचा बाप एक खानावळ चालवीत असे. राजधानीकडे जाणारे अनेक प्रवासी वाटेत या खानावळीत उतरत व राजकारणावर गप्पा झोडीत बसत. ब्युरेनला लहानपणापासून या चर्चा ऐकावयास मिळत. वयाच्या चौदाव्या वर्षी शाळेला चाट देऊन, त्याने एका वकिलाकडे कारकुनी पत्करली; आणि थोड्याच दिवसांत या उमेदवारीतून तो एक नामांकित वकील म्हणून ओळखला जाऊ लागला. अव्वल दर्जाच्या वकिलांत त्याची गणना होऊ लागली. राजकारणात तो मन घालू लागला. लोकशाही(डेमोक्रॅट) पक्षात त्याचे वजन चांगलेच वाढले.

अँड्य्रू जॅक्सनच्या निवडणुकीच्या वेळी, त्याने खूपच खटपट केली व त्यामुळे जॅक्सनची त्याच्यावर बहाल मर्जी बसली. अमेरिकेचा कार्यवाह व उपाध्यक्ष अशा दुहेरी भूमिका त्याने सांभाळल्या. ब्युरेन अध्यक्ष झाला आणि देशभर आर्थिक घबराट निर्माण झाला. सट्टेबाजी व भरमसाट वसाहतवाढ यांचा तो परिणाम होता. आर्थिक भरभराटीनंतर आलेली ही मंदीची लाट होती. पेढ्या बंद झाल्या. व्यापार मंदावला व चलन दुर्मीळ झाले.

पुढील अनर्थ टाळण्यासाठी प्रतिनिधीगृहाने एक कायदा मंजूर केला. या कायद्याने सरकारी पैसा पेढ्यात न ठेवता सरकारी खजिन्यात जमा करण्यात येऊ लागला. दुसऱ्या खेपेस मार्टिन व्हॉन ब्युरेन निवडणुकीस उभा राहिला पण 'व्हिग्' नावाने ओळखल्या जाणाऱ्या पक्षाच्या उमेदवाराने त्याला पराभूत केले! व्हिग पक्ष जॅक्सन आणि व्हॉन ब्यूरेन यांच्या धोरणाचा कट्टा विरोधक होता. आठ वर्षांनंतर त्याने अध्यक्षपदाची निवडणूक फिरून लढविली पण तीतही त्याचा पराभव झाला.

●●●

## विल्यम हेन्री हॅरिसन : 'टिपेकॅनोचा वीर'

१८४१

व्हॉन ब्युरेननंतर व्हिग् पक्षाच्या विल्यम हेन्री हॅरिसन अध्यक्षपदावर आला. तो वयाच्या ६९व्या वर्षी सेनापती म्हणून काम पाहात होता. १८१२च्या युद्धाने त्याला पुढे आणले होते. तांबड्या हिंदी लोकांना झोडपून काढण्यातही त्याचा पुढाकार होता. मार्च महिन्याचा झोंबणारा थंडगार वारा घोंघावत असताही, हॅरिसन आपल्या पांढऱ्या शुभ्र उमद्या घोड्यावर बसून शपथविधीसाठी राजधानीत आला. साधा, मनमिळाऊ माणूस म्हणून त्याचा लोकांनी निवडणुकीच्या कालात गौरव केला होता.

व्हर्जिनियातील जेम्स नदीच्या किनाऱ्यावरील एका

शेतीवर हॅरिसनचा जन्म झाला. त्याची घरची स्थिती चांगली होती. त्याचा बाप जॉर्ज वॉशिंग्टनचा स्नेही होता व स्वातंत्र्याच्या जाहीरनाम्यावर सही करणाऱ्यांपैकी तोही एक होता. वयाच्या अठराव्या वर्षी हॅरिसनने आपल्या वैद्यकीच्या शिक्षणाला रामराम ठोकला व वायव्य बाजूला पुंडावा करून वसाहतवाल्यांना उपद्रव देणाऱ्या हिंदी लोकांविरुद्ध चाललेल्या चढाईमध्ये सैनिक म्हणून दाखल झाला. टिपेकॅनो येथे हिंदी लोकांचा संपूर्ण बीमोड त्याने केला व त्यांना शरण आणले. 'इंडिआनाचा' राज्यपाल म्हणून त्याची निवड झाली व त्याने अमेरिकेची वायव्य सरहद्द सुरक्षित करण्याचा प्रयत्न करून त्यात यश मिळविले.

टिपेकॅनोचा हा वीर अध्यक्षीय समारंभाच्या दिवशी सोसलेल्या गारठ्याने व वशिल्याने नोकरीत घुसण्यासाठी आलेल्या लोकांच्या वेढ्याने चांगलाच हैराण झाला. अध्यक्षीय समारंभानंतर अवघ्या एकच महिन्यात न्युमोनियाच्या आजाराला तो बळी पडला.

अमेरिकेचे अध्यक्षपद एक महिनाही उपभोगावयास न मिळणारा हा एकच दुर्दैवी अध्यक्ष!

●●●

## जॉन टेलर : 'टिपेकोन-टेलर'

१८४१ ते १८४५

अमेरिकेच्या घटनेप्रमाणे अध्यक्ष, अध्यक्षपदी असता मरण पावला तर उपाध्यक्ष अध्यक्ष होतो. हॅरिसनच्या हाताखाली उपाध्यक्ष म्हणून टेलर काम पाहात होता. स्वाभाविकच हॅरिसनच्या मृत्यूने रिकामे झालेले अध्यक्षपद त्याच्याकडे आले. 'टिपेकोन टेलर' म्हणूनच ही जोडी निवडक काळात ओळखली जात असे.

उपाध्यक्ष म्हणून टेलरची निवड करताना, हा अध्यक्ष होईल ही गोष्ट कोणाच्या ध्यानीमनीही नव्हती! तो दक्षिण वसाहतींपैकी असून मोठा नम्र व सभ्य होता. त्याने अनेक राजकीय जबाबदाऱ्या सांभाळल्या होत्या, पण चमक अशी कोठेच दाखविली नव्हती. विल्यम्सबर्ग येथील निवासस्थानी हिरवळीवर आपल्या पोराबाळांसमवेत खेळत असताच दूताने येऊन त्याला अध्यक्षाच्या मृत्यूची वार्ता कळविली. अध्यक्षीय शपथविधीसाठी त्याला वॉशिंग्टनला जाणे भाग होते. वाटखर्चासाठी त्याला आपल्या स्नेह्यासोबत्यांकडून उसनवारी करावी लागली. उपाध्यक्षाने अध्यक्षीय जागा भरून काढण्याचा अमेरिकन इतिहासातील हा पहिलाच प्रसंग!

टेलरच्या पत्नीने चार घोड्यांच्या गाडीतून हिंडण्याची प्रथा टेलर अध्यक्षपदी येताच फिरून चालू केली. अध्यक्षीय भवनातील कोणत्याही समारंभाप्रसंगी ती उच्चासनावर बसे. अमेरिकेचे प्रथम क्रमांकाचे नागरिक आपण आहोत असे दिसले पाहिजे असा तिचा आग्रह होता. त्याचा बाप न्यायाधीश व काही दिवस व्हर्जिनियाचा राज्यपाल होता; आणि बापाप्रमाणेच मुलानेही राज्यपालपद उपभोगिले होते. वयाच्या एकविसाव्या वर्षापासून तो 'सीनेट' या प्रतिनिधीगृहाचा सभासद होता.

अध्यक्षीय भवनात टेलरने पाय ठेविला आणि कटकटींना सुरुवात झाली. तो व्हिग-पक्षानुयायी म्हणून जरी निवडून आला होता तरी व्हिग् पक्षाची कित्येक धोरणे त्याला संमत नव्हती. व्हिग् पक्षाने आणलेला एक कायदा त्याने आपल्या खास अधिकारांचा वापर करून धुडकावून लावला. त्याचे सहकारी यामुळे नाराज झाले व त्यांनी अधिकारत्याग केला. टेलरने नवे सहकारी निवडले व 'गुलामगिरी' पद्धतीला चिकटून राहू पाहाणाऱ्या दक्षिण वसाहतींना ते अनुकूल राहातील याची दक्षता घेतली.

ब्रिटनशी कॅनडाच्या सरहद्दीबाबत त्याने तह केला. चीनशी तह करून अमेरिका-चीन व्यापार चालू केला. टेक्सस या संस्थानाला 'संयुक्त अमेरिकन संस्थानात'

सामील करून घेतले. या संस्थानात गुलामगिरीची पद्धत चालू होती. अध्यक्षीय मुदत संपताच, आपल्या उमेदवारीला कोणत्याच पक्षाची सहानुभूती मिळण्याची शक्यता न दिसल्याने तो व्हर्जिनियात आपल्या घरी निघून गेला. दक्षिण संस्थाने 'संयुक्त संस्थानांतून' फुटून निघाली. या फुटून निघालेल्या संस्थानांतील लोकप्रतिनिधीगृहाचा तो सभासद झाला. पुढे यादवीयुद्ध चालू असतानाच तो मरण पावला.

•••

## जेम्स के. पोलक : 'अज्ञात उमेदवार'

१८४५ ते १८४९

अध्यक्षीय निवडणुकीत, अगदी नवखा व अज्ञात उमेदवार म्हणजे जेम्स पोलक! टेलरची अध्यक्षीय मुदत संपण्याच्या सुमारास डेमोक्रॅट पक्षात, अध्यक्षीय उमेदवारी कोणाला द्यावी याबद्दल रणे माजली होती. टेनेस्सीचा राज्यपाल जेम्स पोलक फारच थोड्या लोकांना माहीत होता. खुद्द पोलकही आपल्याला ही संधी मिळेल या कल्पनेत कधीच नव्हता! नुकत्याच सुरू झालेल्या तारायंत्रावरून पोलकच्या उमेदवारीची वार्ता वॉशिंग्टन येथील मुत्सद्द्यांना कळविण्यात आली, त्यांचाही या वार्तेवर विश्वास बसेना. पण इतके असूनही पोलकने निवडणूक जिंकली! अगदी सामान्य व अज्ञात म्हणून मानला गेलेला पोलकच पुढे सर्वांत कार्यक्षम अध्यक्ष ठरला!

उत्तर कॅरोलिनामधील एका शेतीवर पोलकचा जन्म झाला. तो लहान असताच त्याच्या आई-वडिलांनी टेनेस्सी येथे प्रयाण केले व जंगल, झाडोरा तोडून नवी शेती निर्माण केली. पोलकने कॅरोलिना विद्यापीठात राहून कायद्याचा अभ्यास पुरा केला. तो दिसायला बुटका होता, पण त्याच्या बोलण्यात कमालीचा करारीपणा असे.

पोलक डेमोक्रॅट पक्षाचा कट्टर पुरस्कर्ता होता. टेनेस्सी विधिमंडळाचा व अमेरिकन राष्ट्रसभेचा तो सतत चौदा वर्षे सभासद होता. टेनेस्सीचा राज्यपाल म्हणूनही काही दिवस त्याने काम केले. जेम्स पोलक अध्यक्ष म्हणून निवडून आला, त्यावेळी आपणास काय करावयाचे आहे याची निश्चित कल्पना त्याला होती. त्यावेळी कॅलिफोर्निया हा विभाग मेक्सिकोच्या राज्यात मोडत होता, पण तेथे बरेच अमेरिकन लोक वसाहती करू लागले होते. कॅलिफोर्निया अमेरिकेत समाविष्ट करून घेण्याचे पोलकने ठरविले.. टेक्ससच्याही बऱ्याच भागावर मेक्सिकन सरकार आपला हक्क सांगत होते. पोलकने मेक्सिकोविरुद्ध चढाई करण्याची आज्ञा देऊन मेक्सिकोला वठणीवर आणले व कॅलिफोर्निया, न्यू मेक्सिको आणि ॲरिझॉन एवढा प्रचंड प्रदेश मेक्सिकोकडून विकत घेऊन अमेरिकेत समाविष्ट करून टाकला.

१८४८ मध्ये कॅलिफोर्नियात सुवर्ण सापडल्याची वार्ता राष्ट्रसभेत पोलकने जाहीर केली. उकरण्याच्या श्रमाच्या मोबदल्यात सोने मिळू लागले! एवढ्या समृद्ध खाणी या प्रदेशात सापडल्या. अध्यक्षीय मुदत संपल्यानंतर अवघ्या तीनच महिन्यांनी पोलक वयाच्या त्रेपन्नाव्या वर्षी मरण पावला. अमेरिकेच्या ऐन वाढीच्या काळात तिला हवा होता तसा खंबीर अध्यक्ष लाभला!

•••

## झकारी टेलर : 'तय्यार खमक्या म्हातारा!'

१८४९ ते १८५०

जेम्स पोलकनंतर अध्यक्षपद एका शिपाईगड्याकडे आले. 'तय्यार खमक्या म्हातारा' म्हणून ओळखल्या जाणाऱ्या टेलरचे सर्व आयुष्य लष्करी पेशात गेले होते.

मेक्सिकोच्या युद्धात गाजविलेल्या मर्दुमकीमुळे झकारी टेलरचे नाव सर्वतोमुखी झाले होते. प्रामाणिक व एकमार्गी सरळ मनुष्य म्हणून तो सर्वांना माहीत होता. त्याचे पाय फार आखूड होते, त्यामुळे घोड्यावर बसताना त्याला दुसऱ्याची मदत घ्यावी लागे. त्याला राहुटीतील राहाणी अधिक पसंत असे. त्याची बायकोही त्याच्या लष्करी जीवनात नेहमीच त्याच्याबरोबर असल्याने तिलाही अध्यक्षीय भवनातील जीवनाबद्दल फारशी आस्था नव्हती.

टेलरचा बापही एक लष्करी अधिकारीच होता; त्यामुळे रायफल वापरण्याचे शिक्षण त्याला अगदी बालपणीच मिळाले होते. केंटुकीच्या सरहद्दीवर बापाबरोबर त्याला राहावे लागले. त्या ठिकाणी जंगलातून राहाणारे 'रेड इंडियन' नेहमीच अमेरिकन सैन्याशी सामना देत. त्याला शिक्षण असे फारसे मिळालेच नाही. बालपणापासून अनेक संकटांना तोंड द्यावे लागल्याने व कष्ट सहन करावे लागल्याने तो चांगलाच कणखर बनला होता. त्याच्यामध्ये जबर आत्मविश्वास निर्माण झाला होता.

वयाच्या तेविसाव्या वर्षी तो अमेरिकन लष्करात लेफ्टनंट झाला. रेड इंडियन लोकांशी झालेल्या लढायांत त्याने चांगलीच कामगिरी बजावली. १८१२च्या लढाईत तो चांगलाच चमकला. लष्करी पेशात त्याने सतत चाळीस वर्षे काढली. मेक्सिकन युद्धात तो सेनापती होता. मेक्सिकन सेनापती 'सांता ॲना' याच्याकडे, त्याच्यापेक्षा कितीतरी पटींनी अधिक सैन्य असूनही टेलरने त्याला पराभूत केले. टेलर अध्यक्ष झाला त्यावेळी गुलामगिरीच्या प्रश्नावर कमालीची कटुता निर्माण होऊ लागली होती. कॅलिफोर्नियाने अमेरिकेतील एक स्वायत्त संस्थान म्हणून नांदावयास मिळावे असा अर्ज दाखल केला होता. पण महत्वाचा प्रश्न होता तो हाच की, अमेरिकेत समाविष्ट झालेल्या प्रदेशात गुलामगिरीची पद्धत चालू ठेवावी की नाही?

अध्यक्षपदाच्या प्राप्तींनी सोळा महिन्यांनी झकारी टेलर मरण पावला! वॉशिंग्टनच्या स्मारकाच्या कामाची पूर्तता करण्यासाठी उन्हातान्हांतून धडपडत असता त्याला उष्णतेची बाधा झाली व पुढे तीनच दिवसांनी तो मरण पावला. टेलरला आपली कर्तबगारी दाखविण्यास संधीच मिळाली नाही. फिरून उपाध्यक्षाला अध्यक्षपद स्वीकारण्यासाठी पाचारण करण्यात आले.

●●●

## मिलार्ड फिलमोर : 'उपाध्यक्षाचा अध्यक्ष!'

१८५० ते १८५३

झकारी टेलरच्या मृत्यूनंतर अध्यक्षपदाची जबाबदारी उपाध्यक्ष मिलार्ड फिलमोर याच्यावर पडली. पण त्याच्या ठिकाणी विशेष अशी कोणतीच कर्तबगारी नव्हती. तो स्वभावानेही सौम्य व भोळसर होता. तो एका सामान्य शेतकऱ्याचा मुलगा होता. पण शिक्षणासाठी त्याचा आत्मा तळमळत होता. तेथील शाळेची शिक्षिका ॲबिगेल पावर्स हिच्या व तेथील न्यायाधीशाच्या साहाय्याने त्याला आपला कायद्याचा अभ्यासक्रम पुरा करता आला. त्याने पुढे याच ॲबिगेलशी विवाह करून वकिली चालू केली व राजकारणात मन घातले.

फिलमोर गुलामगिरीच्या विरुद्ध होता. पण अध्यक्षपदावर येताच त्याने इतर मुत्सद्द्यांच्या कलाने चालण्यास सुरुवात केली. पळून जाणाऱ्या गुलामांना व त्यांना आश्रय देणाऱ्यांना कडक शासन करणाऱ्या १८५०च्या कायद्यावर त्याने सही केली. कमांडर पेरीला जपानला पाठवून त्याने अमेरिकन व्यापारासाठी जपानी बंदरे खाली करून घेतली. अध्यक्षीय भवनात एक ग्रंथालय तयार केले. झकारी टेलरच्या उरलेल्या मुदतीची पूर्तता फिलमोरने केली! चार वर्षांनंतर त्याने एकदा अध्यक्षीय निवडणूक लढविली पण तो पराभूत झाला. न्यूयॉर्कमधील बफेलो या ठिकाणी तो मरण पावला.

●●●

**फ्रँक्लिन पियर्स : 'देखणा अध्यक्ष'**

१८५३ ते १८५७

सुहास्य मुद्रेचा, देखणा पियर्स फिलमोरनंतर अध्यक्षपदी आला. पियर्सचा बाप न्यू हँपशायर संस्थानाचा राज्यपाल होता. बॉडोइन विश्वविद्यालयात त्याने कायद्याचा अभ्यास पुरा केला. त्याच्या सौजन्यामुळे तो सर्वांनाच प्रिय होता. मेक्सिकोच्या युद्धात तो ब्रिगेडियरच्या हुद्द्यापर्यंत चढला. समरभूमीवर घोड्यावरून पडल्यामुळे तो जखमी झाला. त्याच्या निवडणुकीच्या वेळी त्याचे विरोधक या घटनेचा उपहासपूर्वक उल्लेख करीत असत.

त्याच्या अध्यक्षीय कारकिर्दीत गुलामगिरीचा प्रश्न मिटला तर नाहीच, पण अधिक उग्र स्वरूप धारण करून बसला. मिसुरी कायद्याने पूर्वी कान्सस व नेब्रस्का हे विभाग गुलामगिरी पद्धतीमधून मुक्त झाले होते, पण पियर्सने मंजूर केलेल्या 'कान्सस नेब्रस्का कायद्याने' फिरून तेथे गुलामगिरी पद्धती चालू केली. स्वाभाविकच दंगेधोपे व रक्तपात यांना ऊत आला. अध्यक्षीय मुदत संपताच पियर्स निवृत्त होऊन न्यू हँपशायरकडे रवाना झाला. उत्तर संस्थानांना त्याचे दक्षिण संस्थानांना अनुकूल असे धोरण नापसंत असल्याने फिरून त्याला अध्यक्षपदीय उमेदवारीची संधी देण्यात आली नाही.

●●●

**जेम्स बुकॅनन : 'गांजलेला अध्यक्ष'**

१८५७ ते १८६१

अमेरिकेच्या इतिहासातील अत्यंत आणीबाणीच्या वेळी जेम्स बुकॅननकडे अध्यक्षपद आले. लंडनमध्ये अमेरिकेचा वकील म्हणून बरेच दिवस तो काम पाहात असल्याने, गुलामगिरीच्या प्रश्नावर अमेरिकेत माजलेल्या तंट्या-बखेड्यापासून तो सर्वस्वी अलिप्त होता व यामुळेच अध्यक्षपदी त्याची निवड होणे सुलभ झाले. गुलामगिरीला तो प्रतिकूल होता पण ज्या संस्थानांत ही पद्धती अस्तित्वात होती, त्यांच्या अंतर्गत कारभारात ढवळाढवळ करण्यासही त्याची तयारी नव्हती.

बुकॅनन प्रेमळ होता; कायदेपंडित व मुत्सद्दीही होता; पण अध्यक्ष या नात्याने तो बुजरा तर होताच पण ठाम निर्णय करण्याची कुवतही त्याच्यामध्ये नव्हती. देशाला खंबीर नेतृत्वाची या काळात गरज होती, पण बुकॅननपासून ती अपेक्षा पुरी होऊ शकली नाही. त्याने आपल्या नात्यातील एक सुंदर तरुणी अध्यक्षीय भवनात आणली. तिच्यावर त्याचे प्रेम होते पण त्याने तिच्याशी विवाह

मात्र केला नाही.

पेन्सिल्व्हानियात त्याचा जन्म झाला. त्याचा बाप आयरिश होता. मेक्सिकन युद्धात त्याने वयाच्या एकविसाव्या वर्षी भाग घेतला. युद्धोत्तर काळात त्याने राजकारणात मन घातले. बुकॅननच्या काळात अटलांटिक महासागरामधून तारा घालून इंग्लंड-अमेरिकेत विद्युत संदेशांचे दळणवळण चालू झाले. या तारांच्या साहाय्याने व्हिक्टोरिया राणीने बुकॅननला प्रथम संदेश दिला.

जपानशी व्यापारी देवघेव चालू झाली होती. वॉशिंग्टनमध्ये बुकॅननने जपानी वकिलात उघडण्यास परवानगी दिली. पण याच कालात अमेरिकेच्या राजकीय क्षितिजावर वादळी वारे घोंघावू लागले होते, कृष्णमेघ गोळा होऊ लागले होते.

गुलामगिरीच्या प्रश्नावर उत्तर व दक्षिण संस्थानांचे उघड उघड तट पडले होते. गुलामगिरी नष्ट करण्याचा अधिकार राष्ट्रसभेला नाही, असा निर्णय अमेरिकेतील सर्वोच्च न्यायालयाने दिला. जॉन ब्राऊन नावाच्या इसमाने गुलामांना चिथावणी देऊन बंडाला प्रवृत्त केले. गुलामांच्या उठावणीचे पर्यावसन जॉन ब्राऊनला फाशी देण्यात झाले. बुकॅननची मुदत संपण्याच्या सुमारास रिपब्लिकन पक्षाने आपल्या बैठकीत अध्यक्षीय निवडणुकीसाठी अब्राहम लिंकनची उमेदवार म्हणून नियुक्ती केली. लिंकन गुलामगिरीचा कट्टा विरोधक म्हणून महशूर असल्याने, 'साऊथ कॅरोलिना' या संस्थानाने आपण 'संयुक्त संस्थानातून' फुटून निघाल्याचे जाहीर केले. पाठोपाठ आणखीही सहा संस्थाने बाहेर पडली व अमेरिकेच्या संयुक्त राज्याला तडा गेला. फुटून निघालेल्या या दक्षिण संस्थानांनी आपले नवे संघराज्य निर्माण करून 'रिकमंड' शहर आपली राजधानी केली.

बुकॅननच्या कारकिर्दीत अमेरिका भंग पावली. तो निराश मनाने निवृत्त होऊन आपल्या शेतीवर निघून गेला. पुढे तो सात वर्षे हयात होता.

●●●

## अब्राहम लिंकन : 'प्रामाणिक ॲबे'

१८६१ ते १८६५

१८६१मध्ये अध्यक्षीय अधिकार स्वीकारण्याच्या दिवशी, नव्या अध्यक्षाचे स्वागत करण्यासाठी राजधानीत असंख्य लोक गोळा झाले होते. अब्राहम लिंकन उंचापुरा गडी होता. त्याची चाल दिमाखदार होती. भाषणात गांभीर्य होते! खणखणीतपणा होता! दक्षिण संस्थानांत अस्तित्वात असलेल्या गुलामगिरी पद्धतीत ढवळाढवळ करण्याची आपली मनीषा नसल्याचे त्याने जाहीर केले, पण त्याच वेळी संयुक्त संघटनेतून त्यांनी फुटून निघण्याचा आततायीपणा करू नये असाही इशारा दिला.

लिंकनचा जन्म एका सामान्य शेतकरी कुटुंबात झाला होता. त्याचा आजा रेड इंडियन लोकांकडून मारला गेला होता. अब्राहम ऊर्फ ॲबे नऊ वर्षांचा असताच त्याची आई मरण पावली. त्याच्या बापाने दुसरे लग्न केले; पण त्याच्या या नव्या आईने या मुलावर प्रेम केले, त्याला वळण लावले.

वयाच्या एकोणिसाव्या वर्षी अब्राहम सहा फूट चार इंच उंच होता. त्याचा बांधा मात्र अगदीच किरकोळ होता. एकंदरीत प्रकृती मात्र चिवट व कणखर! भीती हा शब्दही त्याच्या गावी नसे. ओहिओ व मिसीसिपी या दोन नद्यांमधून एका छोट्या होडीने प्रवास करून, वयाच्या अवघ्या एकोणिसाव्या वर्षी त्याने 'न्यू ऑर्लिअन्स' गाठण्याचा विक्रम करून दाखविला होता.

एका छोट्या खेड्यात राहून तो अनेक कामे करून आपली गुजराण करीत असे. पोस्टमन, दुकानातील पोऱ्या, हरकाम्या कामगार असे अनेक उद्योग त्याने केले, पण हे करीत असताना त्याने आपला वाचनाचा छंद चालूच ठेवला होता. बेताबेताने कायद्याची पुस्तके अभ्यासण्यापर्यंत त्याने आपली मजल नेली. खेडूत त्याच्याभोवती गोळा

होत. तो त्यांना गोष्टी सांगे, गंमती सांगून हसवी! अन्यायाची त्याला चीड होती. गुलामगिरीचा तो तिरस्कार करी! हळूहळू त्याने राजकारणात प्रवेश केला. विधिमंडळात आठ वर्षे सदस्य म्हणून काम केल्यानंतर त्याने वकिली चालू केली. तो फिरता वकील म्हणून, त्या भागात जेथे जेथे न्यायकचेरी असेल तेथे तेथे कामे चालविण्यास जात असे.

याच विभागातून तो राष्ट्रसभेचा प्रतिनिधी म्हणून निवडून आला. स्टीफन डग्लस या मुरब्बी मुत्सद्द्याबरोबर त्याने गुलामगिरीच्या प्रश्नावर अनेक वेळा वादविवाद केला. हा संवाद ऐकण्यासाठी अनेक लोक या उभयतांच्या भोवताली गोळा होत. वृत्तपत्रांमधून या चर्चा होत व त्यामुळे देशभर त्यांचा प्रसार होई. लिंकन अध्यक्षपदी निवडून आला, त्यावेळी दक्षिण संस्थाने फुटून विभक्त झाली होती. दुहीने भंगलेल्या देशाच्या अध्यक्षपदाचा मान त्याला मिळाला!

अध्यक्षपद स्वीकारण्यासाठी तो स्प्रिंगफील्डहून वॉशिंग्टनला येण्यास निघाला त्यावेळी आपणावर केवढी मोठी जबाबदारी येऊन पडली आहे या जाणिवेने तो भारावला होता. आगगाडीच्या डब्याच्या मागील बाजूस तो उभा होता. त्याने खांद्यावर एक शाल टाकली होती. दाट व काळीभोर दाढी त्याने राखली होती. त्याने आपल्या स्नेह्यासोबत्यांचा निरोप घेतला. हॅरिसबर्ग स्टेशनवर त्याला, त्याच्या विरुद्ध काहीतरी कट शिजत असल्याची वार्ता मिळाली. त्याने आगगाडीचा प्रवास तेथेच पुरा केला व एका गुप्त पोलिसाच्या संरक्षणाखाली तो गुपचुपपणाने वॉशिंग्टन येथे येऊन दाखल झाला.

अध्यक्षीय भवनात त्याने प्रवेश करून सहा आठवडे लोटले नाहीत तोच दक्षिण संस्थानाच्या तोफखान्याने, सरकारच्या ताब्यातील स्टूमर किल्ल्यावर तोफा डागून यादवी युद्धाला तोंड पाडले. उत्तर व दक्षिण यांमधील लढ्याला सुरुवात झाली. लिंकनने 'संयुक्त संस्थाना'चे संरक्षण करण्यासाठी प्रत्येक माणसाला युद्धकार्यासाठी पाचारण केले. सतत चार वर्षे त्याने रणकंदन चालू ठेवले होते. त्याला अनेक धमक्या देण्यात येत होत्या पण तो डगमगला नाही! टीकेला त्याने भीक घातली नाही. अमेरिकन राष्ट्राविरुद्ध पुंडावा करून उठणाऱ्या संस्थानांतील गुलामांना स्वातंत्र्य देण्यात आल्याचे त्याने जाहीर केले. फार काय, सर्व अमेरिकेत गुलामगिरीची पद्धत बंद करण्यात आल्याचे त्याने जाहीर केले! हजारो निग्रो लोकांना यामुळे एकदम स्वातंत्र्य मिळाले! 'जनतेचे, जनतेने बनविलेले व जनतेसाठी सरकार!' ही लोकशाही राजवटीची बिरुदावली त्याने याच प्रसंगी उच्चारली!

या खणाखणीने त्याला दु:ख झाले, त्याचा आनंद मावळला, आपापसांतील या रक्तपाताने त्याला असह्य वेदना झाल्या आणि अशा या परिस्थितीतच फिरून दुसऱ्यांदा त्याची अध्यक्षपदी निवड झाली. या निवडीनंतर आपल्या प्रथम भाषणात तो म्हणाला, 'आमचे कोणाशी वैर नाही, हेवादावा नाही, सर्वांशी सहानुभूतीने आम्हाला वागावयाचे आहे पण परमेश्वराच्या घरी रास्त, न्याय्य असलेल्या गोष्टींसाठी मात्र अविश्रांत लढा देण्याची आमची तयारी आहे. हाती घेतलेले काम पुरे करण्यासाठी आपण निश्चयाने झटूया!' आणि यानंतर एकच महिन्याने बंडखोर संस्थानाचा सेनापती रॉबर्ट ली शरण आला. हां हां म्हणता ठिकठिकाणची सैन्ये शरण आली आणि हे यादवी युद्ध आटोपले.

१४ एप्रिल १८६५ ला 'गुडफ्रायडे' होता. यादवी युद्धाचा निर्णय लागल्याने समाधानात असलेला लिंकन 'फोर्ड' नाट्यगृहात नाटक पाहाण्यासाठी सपत्नीक गेले. त्यांच्यासाठी खास राखून ठेवलेल्या जागेवर ते बसले होते; पण दक्षिण संस्थानांबद्दल आस्था बाळगणाऱ्या कोणा एका माथेफिरूने त्यांच्यावर पिस्तुलाने गोळ्या झाडल्या. दुसऱ्या दिवशी सकाळी लिंकनचे प्राणोत्क्रमण झाले.

सारे राष्ट्र त्याच्या मृत्यूने अक्षरश: रडले! त्याचे शव घेऊन स्प्रिंगफील्डला जाणाऱ्या गाडीला लोकांनी दुतर्फा उभे राहून मानवंदना दिली. अमेरिकेला नवजीवन देणाऱ्या, लाखो लोकांना स्वातंत्र्य देणाऱ्या लिंकनचा जड देह या गाडीत होता!

●●●

## अँड्र्यू जॉन्सन : 'उपाध्यक्षाचा अध्यक्ष'
१८६५ ते १८६९

लिंकनच्या मृत्यूनंतर काही तासांतच जॉन्सनचा शपथविधी तो राहात असलेल्या हॉटेलमधील एका खोलीत उरकण्यात आला. उपाध्यक्ष म्हणून त्याने अवघा एकच महिना काम पाहिले होते. वस्तुत: तो दक्षिण संस्थानचा रहिवासी होता, पण त्याने गुलामगिरीविरुद्ध निग्रहाने लढा दिला असल्याने लिंकनने त्याची टेनस्सीचा लष्करी राज्यपाल म्हणून निवड केली होती. दुसऱ्यांदा आपणाकडे अध्यक्षपद येताच लिंकनने त्याची उपाध्यक्षपदी नियुक्ती केली. तो निर्भय होता, सरळमार्गी होता, पण लिंकनचे ज्ञान व सहनशीलता यांचा अभाव मात्र त्याच्या ठिकाणी होता.

नॉर्थ कॅरोलिनामधील रॅले या ठिकाणी त्याचा जन्म झाला होता. वयाच्या दहाव्या वर्षी त्याचा बाप वारला व त्याने एका शिंप्याच्या दुकानी उमेदवारी चालू केली. वयाच्या सोळाव्या वर्षी त्याने ग्रीनव्हील शहरी पळ काढला व तेथे आपले शिंप्याचे स्वतंत्र दुकान चालू केले. त्याच्या बायकोने त्याला लिहिण्या-वाचण्यास शिकविले.

अनेक शेतकरी व कामगार त्याचे मित्र होते. आपल्या दुकानात बसून तो या लोकांच्या बरोबर राजकीय विषयांची चर्चा करी! लवकरच तो या लोकांचा पुढारी बनला. एवढ्या भांडवलावर त्याने नगराध्यक्ष पदापर्यंत मजल मारली. टेनस्सीच्या राज्यपालपदीही पुढे त्याची नियुक्ती झाली पण आपले पूर्वचरित्र तो कधीच विसरला नाही.

जॉन्सन अध्यक्षपदी आला, त्याच्या पूर्वीच दक्षिण संस्थानांची पुनर्रचना करण्याचे लिंकनचे उदार धोरण अमेरिकन काँग्रेसला संमत नव्हते. जॉन्सनने लिंकनचे धोरण खंबीरपणाने उचलून धरण्याचे ठरविताच त्यांच्यात व राष्ट्रसभेत चांगलेच वितुष्ट आले. राष्ट्रसभेने एक कायदा मंजूर करून अध्यक्षपदाचा एखाद्या वरिष्ठ नोकराला कामावरून दूर करण्याचा अधिकार काढून घेतला. जॉन्सनने राष्ट्रसभेचे हे कृत्य घटनाबाह्य मानून निर्भयपणाने, आपणास विरोध करणाऱ्या युद्धखात्याच्या चिटणीसाला कामावरून दूर करण्याचा आग्रह धरला. राष्ट्रसभेने त्याच्या या कृत्याला कसून विरोध केला व हे प्रकरण इतके चिघळले की, खुद्द अध्यक्षाच्याच चौकशीची मागणी अमेरिकन काँग्रेसने केली. वरिष्ठ प्रतिनिधिगृहाच्या अधिकाऱ्याने सदर चौकशीचा हुकूम त्याच्यावर बजावला. देशभर या प्रकरणाने मोठीच धमाल उडाली. ही चौकशी चालू असता सर्व जनता दिङ्मूढ होऊन मोठ्या कसोशीने या प्रकरणात मन घालीत होती. शेवटी फक्त एकच मत जॉन्सनला या संकटातून मुक्त करण्यास कारणीभूत झाले व या दिव्यातून तो पार पडला.

जॉन्सनवर जरी बाका प्रसंग आणला गेला तरी त्याचा प्रामाणिकपणा व निष्ठा यांबद्दल त्याच्या वैऱ्यांनाही कधी शंका आली नाही. अध्यक्षीय मुदत संपल्यानंतर सात वर्षांनी तो फिरून सिनेटचा (वरिष्ठ गृहाचा) सभासद म्हणून निवडून आला.

●●●

## युलॅसिस एस. ग्रँट : 'विजयी सेनापती'

१८६९ ते १८७७

यादवी युद्धातील यशस्वी सेनापती युलॅसिस ग्रँट, अँड्र्यू जॉन्सननंतर अध्यक्षपदी निवडून आला. आपल्या लष्करी कौशल्याने यादवी युद्धाचा यशस्वी शेवट करणारा सेनापती म्हणून तो सर्वांना माहीत होता. रणक्षेत्रावर तो करडा व अविश्रांत परिश्रम करणारा म्हणून महशूर होता, पण खाजगी जीवनात तो अगदीच सौम्य, प्रेमळ व शांत होता.

ग्रँटचा जन्म ओहिओ नदीवरील एका खेड्यात झाला होता. त्याच्या बापाचा चामडी कमावण्याचा धंदा होता. आपल्या वयाच्या सातव्या वर्षापासून ग्रँटला घोड्यांचा विशेष षोक होता. वयाच्या सतराव्या वर्षी बापाच्या आग्रहाखातर त्याने विश्वविद्यालयीन अभ्यासात मन घातले. त्याला शिकण्याची अशी फारशी उत्सुकता नव्हतीच! मेक्सिकन युद्धाच्या वेळी तो सैन्यात दाखल झाला पण पुढे लवकरच ती नोकरी सोडून त्याने शेतीत मन घातले. पण याही व्यवसायात त्याला यावे तसे यश आले नाही. पुढे आपल्या भावाच्या चामड्याच्या व्यापारात त्याने मन घातले आणि लिंकनने सैन्यभरतीचा आदेश दिला. तत्काळ तो अमेरिकन सैन्यांत फिरून दाखल झाला.

यादवी युद्धाचा यशस्वी शेवट व्हावा म्हणून ग्रँटने अविश्रांत परिश्रम केले. त्याचे तेज दिवसेंदिवस लिंकनच्या नजरेला येऊ लागले. लष्करी कसब, चाणाक्ष बुद्धी, तडकाफडकी निर्णय करण्याची कुवत यामुळे अमेरिकन सैन्याचे आधिपत्य त्याच्याकडे आले व त्याने त्याचे चीज करून दाखविले. दक्षिण संस्थानाचा सेनापती ली त्याला रिकमंड येथे शरण आला. ग्रँटने पराभूत सैन्याला सूडबुद्धीने वागविले नाही. सैनिकांना त्याने पुनर्रचनेच्या विधायक कार्याला लागण्याचा आदेश दिला. प्रचंड विजय मिळवून तो आपल्या तंबूत परत आला, पण अभिमानाचा गंधही त्याला शिवला नाही.

ग्रँट अध्यक्षपदी आला तेव्हा दक्षिण संस्थानाची पुनर्रचना व युद्धोत्तर मंदी या दोन महत्वाच्या प्रश्नांना त्याला तोंड द्यावयाचे होते. पण ग्रँट शिपाईगडी होता, मुत्सद्दी नव्हता! उदार हृदयी अशा या माणसाने बालकाच्या सरळ बुद्धीने आपले मित्र व नातेवाईक यांची सरकारी नोकरीत भरती केली. स्वाभाविकच लाचलुचपत व वशिलेबाजी यांना ऊत आला. तो लागोपाठ दोन वेळा अध्यक्ष झाला. तिसऱ्या वेळीही तो निवडणुकीस उभा राहिला पण एव्हाना राष्ट्राचा त्याच्यावरील विश्वास संपूर्ण उडाला होता. तिसऱ्या वेळी त्यास अपयश आले.

अध्यक्षीय भवन सोडल्यानंतर त्याने जगाची सफर केली व पुढे न्यूयॉर्क येथील एका दलालाकडे भागीदारी पत्करली! त्याचे भागीदार लबाड निघाल्याने त्याच्या या नव्या धंद्याचे दिवाळे वाजले! या प्रसंगाने तो संपूर्ण खचून गेला. दारिद्र्य व शारीरिक व्याधी यांनी व्यापलेले कष्टप्रद जिणे कंठण्याची पाळी त्याच्यावर आली व त्यातच तो मरण पावला. न्यूयॉर्क येथेच त्याला पुरण्यात आले. त्याच्या समाधीच्या दर्शनी भागावर लिहिले आहे, ''आम्हाला शांतता लाभू दे!''

●●●

## रूथरफोर्ड हेस : 'सज्जन हेस'

१८७७ ते १८८१

ग्रँटची अध्यक्षीय मुदत संपत आली आणि अमेरिकन जनतेत एक प्रकारे घबराट निर्माण झाली. सरकारच्या प्रत्येक खात्यात अप्रामाणिकपणा व लाचलुचपत यांचा सुळसुळाट झाला होता. ही सर्व घाण साफ झटकून टाकील असा एखादा अध्यक्ष आपणास कसा लाभेल हीच एक चिंता अमेरिकन जनतेला ग्रासून राहिली होती.

एकोणिसावे अध्यक्षपद संपादन करणारा रूथरफोर्ड हेस अध्यक्षीय भवनात आला आणि त्याच्यापुढे एक बिकट

समस्या आली! त्याच्या निवडणुकीबद्दलच तंटा निर्माण झाला. निवडणूक अत्यंत चुरशीची झाली असल्याकारणाने जो तो आपल्या पक्षाने जिंकली या आशेत होता. एकमेकांच्या विरुद्ध उपयोगी पडतील अशा मतदानातील तांत्रिक चुका हुडकून काढण्याचे काम कसोशीने चालू होते आणि त्यामुळे हेसची निवड जाहीर होऊनही 'चौकशी समिती' नियुक्त करण्यात आली. या समितीचा निर्णय हेसला अनुकूल असाच लागल्याने त्याचे पाय अध्यक्षीय भवनात स्थिरावले!

हेसचा जन्म डेलवेअरमध्ये झाला. त्याच्या काकाने त्याला विश्वविद्यालयामध्ये दाखल केले व त्याचा कायद्याचा अभ्यास पुरा करून घेतला; पण पुढे वकिली सोडून तो सैन्यात दाखल झाला. त्याने अनेक युद्धांत भाग घेतला व एका वेळी तो जखमीही झाला होता. युद्धानंतर तो दोन वेळा राष्ट्रसभेत निवडून आला. अध्यक्ष म्हणून वॉशिंग्टनला तो अध्यक्षीय भवनात येऊन दाखल झाला तरी त्याने आपली साधी राहणी सोडली नव्हती. तो व त्याची पत्नी उभयताही मोठ्या धार्मिक वृत्तीची होती. सकाळची प्रार्थना त्यांनी कधीच चुकू दिली नाही.

सरकारी कारभारात सुधारण्याची पराकाष्ठा त्याने केली. आपल्या अधिकाराचा दुरुपयोग करणारा प्रत्येक अधिकारी कामावरून दूर करण्याची दक्षता त्याने घेतली. लायक माणसांच्या नेमणुका करताना त्याने पक्षाभिनिवेशाला मुळीच थारा दिला नाही. तो नेहमी म्हणे, 'जो सर्वोत्तम देशसेवा बजावतो तोच आपल्या पक्षाची खरीखुरी सेवा करतो!' दक्षिण संस्थानात ठाण मांडून बसलेले अमेरिकन सैन्य त्याने काढून घेतले व त्याला पुनर्रचनेच्या कार्याला सरकारी अडथळ्याशिवाय लागता यावे अशी परिस्थिती निर्माण करून दिली. त्याच्या चार वर्षांच्या अध्यक्षीय कारकीर्दीत देशाची स्थिती खूपच सुधारली होती व तो अधिक लोकप्रिय झाला होता.

सेवानिवृत्तीनंतर ओहिओमधील फ्रीमांट येथे तो जाऊन राहिला. तुरुंगाची सुधारणा करणे, शाळा उघडणे, लष्करी शिपायांची स्थिती सुधारणे, वगैरे अनेक सार्वजनिक कामात त्याने मरेपर्यंत लक्ष घातले.

●●●

## जेम्स गारफील्ड : 'औट घटकेचा राजा'

१८८१

रिपब्लिकन पक्षाने हेसनंतर अध्यक्षीय निवडणुकीसाठी उमेदवार म्हणून जेव्हा गारफील्डची निवड केली, तेव्हा त्याचा स्वत:चाच या गोष्टीवर विश्वास बसेना. गारफील्ड तगडा जवान होता. सिनेटचा सभासद म्हणून त्याला राजकारणाचा अनुभवही होता. तो विद्वान तर होताच, पण त्याच्या राजकीय जीवनाचा इतिहासही निष्कलंक होता. यादवी युद्धात एका सैन्यविभागाचा प्रमुख म्हणून त्याने काम केले होते.

ओहिओमधील ऑरेंज या ठिकाणी त्याचा जन्म झाला होता. एका वणव्याशी झगडताना त्याचा बाप मरण पावला. आईच्या देखरेखीखाली तो वाढला. वयाच्या सोळाव्या वर्षापासून त्याला नावाडी म्हणून काम करावे लागले. पण त्याने आपला वाचनाचा छंद सोडला नाही.

काँग्रेसमध्ये निवडून येण्यापूर्वी त्याने आपली सैन्यातील नोकरी सोडून दिली. पुढे सिनेटवरही त्याची निवड झाली पण ती जागा घेण्यापूर्वीच अध्यक्षपदाचा मान त्याला मिळाला. गारफील्ड चांगल्या स्वभावाचा व दयाळू माणूस होता. अध्यक्षपदी येऊन चार महिने झाले नाहीत तोच एका असंतुष्ट लष्करी अधिकाऱ्याने त्याच्यावर गोळ्या झाडल्या. पुढे दोन महिन्यांनी तो मरण पावला.

●●●

## चेस्टर आर्थर : 'उपाध्यक्षाचा अध्यक्ष'

१८८१ ते १८८५

गारफील्डच्या मृत्यूनंतर थोड्याच तासात उपाध्यक्ष चेस्टर आर्थर याचा शपथविधी होऊन त्याला अध्यक्षपद मिळाले. उपाध्यक्षपद काही राजकीय सौदेबाजी करून त्याने मिळविले असा प्रवाद होता. आर्थर उंचनिंच असून मोठा देखणा होता. गारफील्डच्या आजारीपणात अध्यक्षपद आपणाकडे आल्यास आपण काय करावे याचा आर्थरने विचार केला. अध्यक्षपदी येताच त्याने आपले धोरण संपूर्ण बदलले. सरकारी कारभार शक्यतो प्रामाणिकपणे व नि:पक्षपातीपणाने चालविण्याची दक्षता त्याने घेतली.

त्याचा बाप धर्मगुरू होता. मुलाचा विश्वविद्यालयीन अभ्यासक्रम पुरा करण्याची दक्षता त्याने घेतली. व्हरमाँटमधील फेअरफील्ड गावी आर्थरचा जन्म झाला होता. यादवी युद्धात पुरवठाधिकारी म्हणून त्याने काम केले. पुढे तो न्यूयॉर्क बंदराचा कलेक्टर होता. हेसच्या कारकीर्दीत काही चुकांमुळे त्याला कामावरून कमी करण्यात आले होते. लोकांच्या अपेक्षेबाहेर त्याने आपली कारकीर्द यशस्वी करून दाखविली. त्याने गारफील्डची जागा मोठ्या निष्ठेने भरून काढली. अध्यक्षीय मुदत संपल्यानंतर त्याने वकिलीकडे लक्ष दिले. पुढे दोनच वर्षांनी तो मरण पावला.

●●●

## ग्रोव्हर क्लीव्हलंड : 'खराटाधारी अध्यक्ष'

१८८५ ते १८८९

चेस्टर आर्थरनंतर डेमोक्रॅट पक्षाचा प्रभावी उमेदवार ग्रोव्हर क्लीव्हलंड अध्यक्ष म्हणून निवडून आला. आपल्या आईने दिलेल्या बायबलच्या एका जुन्या प्रतीवर हात ठेवून त्याने अध्यक्षीय शपथविधी पुरा केला. चोवीस वर्षांनंतर प्रथमच डेमोक्रॅट उमेदवाराकडे अध्यक्षपद गेले! झाडू हे त्याच्या अध्यक्षीय निवडणुकीचे चिन्ह होते. आपल्या परगण्यात शेरीफ व पुढे न्यूयॉर्कचा राज्यपाल असताना त्याने लाचलुचपत व वशिलेबाजी पार झटकून काढली. अप्रामाणिकपणाशी लढा देण्यात तो कधीच कसूर करीत नसे.

ग्रोव्हर क्लीव्हलंडचा जन्म न्यूजर्सीमधील काल्डवेल या ठिकाणी एका धर्मगुरूच्या घराण्यात झाला. लहानपणापासून त्याच्या मनावर सत्याचे महत्व ठसविण्यात आले होते. शिकार करणे, मासे धरणे याची आवड त्याला बालपणापासून होती. बापाच्या मृत्यूनंतर एका दुकानात कारकुनी पत्करून त्याने कायद्याचा अभ्यास केला व लवकरच यशस्वी वकील आणि मुत्सद्दी म्हणून लौकिक संपादन केला. अनेक महत्वाच्या राजकीय जबाबदाऱ्या पार पाडल्यानंतर त्याच्याकडे अध्यक्षपद आले.

प्रामाणिक राज्यकारभाराचे एक नवे युग त्याने चालू केले. ''सरकारी अधिकाराची जागा म्हणजे सार्वजनिक विश्वस्ताची जागा'' या तत्वाचा तो पुरस्कर्ता होता. तो खंबीर होता. आपल्या खास अधिकारांचा उपयोग करून त्याने अनेक कायदे मंजूर केले आणि त्यामुळेच काही लोकांना तो अप्रिय झाला. चांदीचे भरमसाट चलन पाडण्यास कडवा विरोध करून त्याने सुवर्णचलनाची बाजू उचलून धरली!

क्लीव्हलंड अध्यक्षपदी आला तेव्हा अविवाहित होता. अध्यक्षीय कारकीर्दीच्या दुसऱ्या वर्षात त्याने एका

कायदेपंडिताच्या कन्येशी विवाह केला. अध्यक्षीय भवनात साजरा झालेला हा पहिलाच विवाहसमारंभ! सरकारी खजिना भरमसाट भरल्याचे दिसून आले, तेव्हा त्याने जकातीचे दर कमी केले. जकातीचे वाढते दर राहणी महागाईची करून काही लोकांच्या मिळकतीत भरमसाट वाढ करतात व सामान्य माणसाला निकृष्ट जीवन कंठण्यास भाग पाडतात, असा त्याचा समज होता. क्लीव्हलंडने दुसऱ्यांदा निवडणूक लढविली, पण फिरून चार वर्षांनी पुन्हा त्याची अध्यक्षपदी निवड झाली. अमेरिकेचा बाविसावा अध्यक्ष फिरून चोविसावा अध्यक्ष झाला.

●●●

## बेंजामिन हॅरिसन : 'कोट्यधीश काँग्रेस'

१८८९ ते १८९३

क्लीव्हलंडच्या दोन अध्यक्षीय कारकिर्दीच्या मधल्या काळात बेंजामिन हॅरिसनने अध्यक्षपद उपभोगिले. अमेरिकेची दीर्घकाल सेवा करणाऱ्या घराण्यात त्याचा जन्म झाला होता. त्याचा बाप काँग्रेसचा सभासद होता. आजा अमेरिकेचा नववा अध्यक्ष होता, तर पणजा स्वातंत्र्याच्या जाहीरनाम्यावर सही करणाऱ्यांपैकी एक होता. यादवी युद्धात तो स्वत: एका सैन्यविभागाचा प्रमुख होता.

तो उत्तम वक्ता होता, पण पक्ष सांगेल त्यापलीकडे वागण्याची त्याची कुवत नव्हती. काँग्रेसने या अध्यक्षाचा संपूर्ण कबजा घेतला होता. तो नाममात्र अध्यक्ष होता. अध्यक्षीय कारभाराची सर्व सूत्रे काँग्रेसने आपल्या हाती घेतली होती. तो अतिशय गिड्डा होता आणि त्यामुळे त्याचे विरोधक त्याचे व्यंगचित्र काढीत, त्यात एका भल्या मोठ्या खुर्चीवर या गिड्डुकल्या अध्यक्षाला बसविण्यात येई व त्याच्या डोक्यावर त्याच्या आजाची टोपी घालण्यात येई.

त्याचा जन्म ओहिओमधील नॉर्थबेंड या ठिकाणी झाला. विश्वविद्यालयीन शिक्षण चालू असताना त्याने लष्करी पेशा पत्करला. चढत चढत तो सैन्याच्या विभाग प्रमुखपदी आला. तो अध्यक्ष झाला त्यावेळी खजिन्यात अपरंपार शिल्लक होती. पण त्यावेळच्या काँग्रेसने या पैशाची भरमसाठ उधळपट्टी केली. 'कोट्याधीशांची काँग्रेस' असे टोपण नाव यामुळेच तिला मिळाले. खजिन्यातील सुवर्ण संचयालाही तिने चांगलीच ओहोटी लावली.

मोठमोठाले उद्योगधंदे वाढले, पण किंमतीही भरमसाठ चढल्या. लोकांत असंतोष निर्माण झाला. बेंजामिन यामुळेच फिरून निवडून येऊ शकला नाही. डेमोक्रॅट पक्षाने फिरून ग्रोव्हर क्लीव्हलंडची उमेदवारी जाहीर केली व धुमधडाक्याने त्याला निवडून आणले.

●●●

## ग्रोव्हर क्लीव्हलंड : 'दुसरी खेप'
१८९३ ते १८९७

क्लीव्हलंड हे दुसऱ्यांदा आलेले अध्यक्षपद पहिल्या खेपेप्रमाणे मानवले नाही! आपली कामे नेटाने पार पाडण्याची शिकस्त त्याने केली, पण एकामागून एक बिकट प्रश्नांना त्याला तोंड द्यावे लागले. मजूर-मालक-लढे, संप यांचे युग आता चालू झाले होते. सरकारकडे असलेला सुवर्णसंचयही अगदी क्षीण झाला होता आणि तो अध्यक्षपदी येतो न येतो तोच राष्ट्रव्यापी आर्थिक आणीबाणीची परिस्थिती निर्माण झाली!

क्यूबा बेटाच्या लोकांनी स्पेनविरुद्ध स्वातंत्र्ययुद्ध पुकारले होते. अमेरिकेने त्यात हस्तक्षेप करावा असे क्लीव्हलंडला वाटले नाही. हवाई बेटातील अमेरिकन वसाहतवाल्यांनी बंड करून तद्देशीय राणीला गुंडाळून ठेवले व आपणास अमेरिकेत समाविष्ट करून घेण्याबद्दल मागणी केली, पण क्लीव्हलंडने तीही मानली नाही.

या साऱ्या भानगडीत आपल्या वैयक्तिक यातनांचा थांगपत्ता त्याने अमेरिकन जनतेला लागू दिला नव्हता. त्याच्यावर एक गंभीर स्वरूपाची शस्त्रक्रिया करावी लागली होती आणि तो कसाबसा वाचला होता. त्याची कित्येक धोरणे त्याला अप्रिय बनविण्यास कारणीभूत होऊ लागली. अमेरिकेने जागतिक राजकारणात आता लक्ष घातलेच पाहिजे व आपल्यापुरते एकलकोंडे राहाण्याची वृत्ती सोडली पाहिजे असे सर्वसाधारण जनमत बनू लागले होते. मुदत संपताच त्याने सेवानिवृत्ती पत्करली.

अमेरिकेचा सर्वात खंबीर अध्यक्ष म्हणून तो ओळखला जातो. ''रास्त ते करण्यासाठी मी झटलो आहे!'' हे त्याचे अखेरचे शब्द!

●●●

## वुइल्यम मॅकिन्ले : 'स्वास्थ्य आणि सुबत्तेसाठी'
१८९७ ते १९०१

क्लीव्हलंडची मुदत संपण्याच्या सुमारास आर्थिक अरिष्ट क्रमश: दूर होत आले होते, त्यामुळे नव्या अध्यक्षाने निवडणुकीत दिलेले सुबत्तेचे आश्वासन पुरे करणे त्याला फारसे कठीण गेले नाही. कँटन येथील आपल्या घराच्या सज्जात उभा राहून तो आपली निवडणुकीची भाषणे करी. क्लीव्हलंडचा कोट्याधीश मार्क हन्ना याचा त्याला निवडणुकीच्या कामी फारच उपयोग झाला. हन्ना श्रीमान् असून, राजकीय क्षेत्रातही त्याचे बडे प्रस्थ होते.

मॅकिन्ले अजातशत्रू होता. त्याचे व्यक्तिमत्वच असे होते की, त्याचे धोरण पसंत नसणारे लोकसुद्धा त्याच्याकडे आकर्षिले जात. लोखंडी भट्टीत काम करणाऱ्या एका कामगाराचा तो मुलगा होता. वयाच्या अठराव्या वर्षी तो टपालखात्यात काम करीत होता. यादवी युद्धात त्याने लष्करात प्रवेश केला व पुढे तो मेजरच्या हुद्यापर्यंत चढला.

अध्यक्ष म्हणून निवडून येण्यापूर्वी तो काँग्रेसचा सभासद व ओहिओचा राज्यपाल होता. त्याच्या कारकिर्दीत अलास्कामध्ये सोन्याच्या खाणी सापडल्या, त्यामुळे अमेरिकेला सुवर्णचलन चालू करणे सुलभ झाले. कागदी अगर इतर कोणत्याही चलनाचे सुवर्णचलनात रूपांतर करणे सरकारला सहज सुलभ झाले.

अमेरिकेचे परराष्ट्रीय धोरणही मॅकिन्लेने पार बदलून टाकले. क्यूबात अमेरिकेने हस्तक्षेप करून क्यूबाच्या लोकांना स्वातंत्र्य मिळवून दिले व तेथे गेलेल्या अमेरिकन लोकांचे हितसंबंधही राखले. क्यूबा अमेरिकेच्या संरक्षणाखाली आले. पोर्टोरिको, गुआम, हवाई,

फिलिपाईन्स ही बेटेही अमेरिकन वर्चस्वाखाली आली. हवाई बेटे अमेरिकेला जोडून टाकण्यात आली.

अमेरिकेच्या प्रदेशाची व्याप्ती अशा रीतीने वाढल्याने अमेरिका एक जागतिक सत्ता बनलली. तिच्या आंतरराष्ट्रीय जबाबदाऱ्या वाढू लागल्या. त्या वेळच्या एका व्यंगचित्रात 'अमेरिके'ची भरमसााठ वाढ झाल्याने तिला जुने कपडे आखूड होऊ लागल्याचे व मॅकिन्ले शिंपी बनून नवे मोजमाप घेत असल्याचे दाखविण्यात आले होते. मॅकिन्लेच्या कारकिर्दीत झालेल्या भरभराटीमुळे त्याला फिरून दुसऱ्यांदा अध्यक्षपदी निवडण्यात आले; पण पुढे सहाच महिन्यांनी एका अराजकाने पिस्तुलाने गोळ्या झाडून त्याला प्राणांतिक जखमी केले. पुढे आठच दिवसांनी तो मरण पावला. अराजकांच्या गोळ्यांना बळी पडलेला हा तिसरा अध्यक्ष!

●●●

## थिओडर रूझवेल्ट : 'बेडर घोडेस्वार'

१९०१ ते १९०९

उपाध्यक्ष थिओडर रूझवेल्ट जंगलमय प्रदेशात छावण्या टाकीत मजेत भटकत होता. एक दिवस एक दूत त्याच्यापुढे येऊन उभा राहिला व त्याने अध्यक्ष मॅकिन्ले अखेरचे क्षण मोजीत असल्याची वर्दी त्याला दिली. तातडीने तो 'बफेलो' येथे येऊन दाखल झाला व मॅकिन्लेच्या मृत्यूनंतर काही तासांतच त्याचा शपथविधी झाला. मुत्सद्दी व वॉलस्ट्रीटमधील भांडवलवाले काही काळ रूझवेल्टच्या निवडीमुळे बेचैन झाले. स्वतंत्र मनोवृत्तीचा हा नवा अध्यक्ष काय धोरण स्वीकारतो हा एकच प्रश्न त्यांच्यापुढे होता.

न्यूयॉर्क येथील एका श्रीमान् घराण्यात थिओडर रूझवेल्ट याचा जन्म झाला. वयाच्या तेरा वर्षांपर्यंत तो एक अशक्त मुलगा होता. दूरचे दिसत नसल्याने अकालीच त्याच्या नाकावर जाड भिंगाचा चष्मा येऊन बसला होता. पण टेडीच्या मनात इतर मुलांप्रमाणे धट्टेकट्टे बनण्याची इच्छा निर्माण झाली व त्याने नियमाने व्यायाम घेण्यास सुरुवात केली. घोडदौड, मुष्टीयुद्ध, तरवार-लढत, इत्यादी अनेक कलांत त्याने मन घातले व थोड्याच दिवसांत उत्तम खेळाडू अशी प्रसिद्धी मिळविली.. हारवर्ड विद्यालयातून त्याने पदवीपरीक्षेचा अभ्यास पुरा केला व कोलंबिया विश्वविद्यालयातून कायद्याची पदवी संपादन केली. आपल्या प्रचंड कुरणात त्याने असंख्य गुरे पाळली व काही काळ घोड्यावरून गुरे वळविण्यात मजेत काढला.

गवे व सिंह यांच्या शिकारी करण्यात त्याला मौज वाटे. इतिहास व खुल्या वातावरणातील स्वच्छंदी जीवन यावर त्याने ग्रंथरचना केली. राजकारणाची त्याला आवड होती. न्यूयॉर्क शहरी पोलिसप्रमुख म्हणून त्याची नियुक्ती होताच लाचलुचपत व गुन्हेगारी याविरुद्ध त्याने चांगलीच मोहीम काढली. आरमार खात्याचा कार्यवाह म्हणून नेमणूक होताच त्याने अमेरिकन आरमारात वाढ केली.

अमेरिका-स्पेन युद्ध सुरू होताच तुफानी घोडेस्वारांची एक तुकडी स्वत: तयार करून तो क्यूबात गेला. तेथे त्याने बजावलेल्या कामगिरीमुळे तो कर्नल झाला. युद्ध संपताच न्यूयॉर्कच्या राज्यपालपदी त्याची नेमणूक झाली. सहा महिने उपाध्यक्षाचे काम केल्यानंतर मॅकिन्लेच्या मृत्यूमुळे अध्यक्षपद त्याच्याकडे आले. अनेक योजना व पुरोगामी कल्पना असलेला हा अध्यक्ष होता. अविश्रांत परिश्रम करण्याची त्याला कुवत होती, हौस होती. रशिया-जपान युद्धात मध्यस्थी करून या दोन राष्ट्रांत त्याने शांतता-तह घडवून आणला.

मोठमोठ्या उद्योगपतींशी झगडून त्याने कामगारांना न्याय मिळवून दिला, पण भांडवलवाल्यांवरही अन्याय न होईल अशी दक्षता त्याने घेतली. सरकारी खात्यांतील लाचलुचपत उघडकीस आणली. बडगाधारी अध्यक्ष

म्हणून तो ओळखला जाऊ लागला. पांढऱ्या शुभ्र व नव्याकोर अशा सोळा युद्धनौकांचा एक काफिला त्याने सातासमुद्रावरून हिंडवून अमेरिकेची आरमारी ताकद जगाच्या निदर्शनास आणली. पनामाचा कालवा काढून पॅसिफिक व अटलांटिक महासागर एकमेकांस जोडून टाकले. कालव्याचे काम चालू असता तो पनामास जाऊन जातीने त्याची पाहाणी करी!

त्याच्या या धडाकेबाज कारकिर्दीमुळे फिरून दुसऱ्या खेपेसही तो अध्यक्ष म्हणून निवडून आला. कामाच्या रगाड्यात त्याला मुलाबाळांबरोबर रमण्यासही वेळ सापडत नसे. अध्यक्षीय भवनातील सर्व घरगुती कारभार त्याच्या पत्नीला पाहावा लागे. सरकारने त्याच्यासाठी एक खास विलासनौका बांधून दिली. दुसरी मुदत संपताच तो आपला मुलगा केरमिट् याला घेऊन सिंहाच्या शिकारीसाठी आफ्रिकेस निघून गेला. तो ज्या ज्या देशात दौऱ्यावर गेला, तेथील सरकारांनी त्याचे सहर्ष स्वागत केले. परत आल्यानंतर तिसऱ्यांदा तो अध्यक्षीय निवडणुकीस उभा राहिला पण त्याला यश मिळाले नाही. अमेरिकेत व युरोपमध्येही अत्यंत लोकप्रिय झालेला अध्यक्ष म्हणजे थिओडर रूझवेल्ट!

●●●

## वुइल्यम एच्. टॅफ्ट : 'न्यायाधीश'

१९०९ ते १९१३

अध्यक्षीय भवनातून बाहेर पडण्यापूर्वीच रूझवेल्टने आपली जागा घेण्यास आपल्या निवडीचा मनुष्य असावा हे विचारात घेऊन व आपले वजन खर्च करून आपला मित्र टॅफ्ट निवडून येईल अशी कोशीस केली व त्याप्रमाणे सत्ताविसावा अध्यक्ष म्हणून टॅफ्ट निवडून आला. निवृत्त अध्यक्ष व नवा अध्यक्ष जोडीनेच घोड्यावर बसून राजधानीत आले. त्यावेळी हवा ढगाळलेली होती, बर्फ पडत होते. टॅफ्ट विनोदाने म्हणाला, 'निसर्ग आपणास अनुकूल दिसत नाही.' टॅफ्ट कसलेला मुत्सद्दी नव्हता आणि झुंजारही नव्हता. अध्यक्षपदासाठीही तो फारसा उत्सुक नव्हता.

ओहिओमधील सिन्‌सिनाटी येथील एका वकीलाचा तो मुलगा. शहरात जन्मलेला हा दुसरा अध्यक्ष. टॅफ्ट दणकट प्रकृतीचा माणूस होता. फुटबॉल खेळाडू म्हणून त्याची प्रसिद्धी होती. येल विद्यापीठाची छात्रवृत्तीही त्याला होती. वकील, मुत्सद्दी व पुढे निःस्पृह न्यायाधीश म्हणून त्याने लौकिक मिळविला. रूझवेल्टने फिलिपाईन बेटांचा पहिला राज्यपाल म्हणून त्याची नेमणूक केली. तेथे असताना टॅफ्टने भरपूर लोकप्रियता संपादन केली. पुढे युद्धखात्याचा कार्यवाह म्हणून त्याची नेमणूक झाली. अध्यक्षपदी आल्यानंतर रूझवेल्टच्या काही धोरणांचा त्याने त्याग केला व त्यामुळे त्याच्याच पक्षात तो अप्रिय होऊ लागला. त्याला 'प्रतिगामी' म्हणून ओळखण्यात येऊ लागले.

युरोपहून परत येताच रूझवेल्टने त्याची खूप हजेरी घेतली व यामुळे या दोघांतील राजकीय वितुष्ट चांगलेच वाढीला लागले! त्याची मुदत संपण्याच्या सुमारास फिरून रिपब्लिक पक्षाने उमेदवार म्हणून त्याची नियुक्ती केली. या पक्षातील रूझवेल्टला अनुकूल असलेल्या गटाने तृतीय पक्ष काढून रूझवेल्टची उमेदवारी जाहीर केली. रिपब्लिक पक्षातील या दुफळीमुळे टॅफ्ट व रूझवेल्ट दोघेही पराभूत झाले व डेमोक्रॅटिक पक्षाचा विड्रो विल्सन अध्यक्ष म्हणून निवडून आला!

टॅफ्टने अध्यक्षीय भवन सोडल्यानंतर येल विद्यापीठात कायदा शिकविण्यास सुरुवात केली. अमेरिकेच्या सर्वोच्च न्यायालयाचा न्यायाधीश म्हणून पुढे त्याची नेमणूक झाली. त्याच्या अत्यंत आवडीचा व्यवसाय त्याला यामुळे मिळाला. प्रमुख न्यायाधीश म्हणून या ठिकाणी नऊ वर्षे त्याने काम केले. अध्यक्षपदापेक्षा या पदावर असताना त्याला अधिक स्वास्थ्य, सुख व आनंद वाटला.

●●●

## विड्रो विल्सन : 'जागतिक शांततेचे स्वप्न'
१९१३ ते १९२१

शांततेचा पुरस्कर्ता विल्सन अध्यक्षपदावर आला त्यावेळी त्याला कल्पनाही नव्हती की, एका भयानक जागतिक युद्धातून राष्ट्रांना मार्गदर्शन करण्याची पाळी आपणावर येईल!

सरकारी कामकाजांचा त्याचा अभ्यास गाढा होता. तो इतिहास-तज्ज्ञही होता; पण लोकांत मिसळण्याची त्याला सवय नव्हती. लोक त्याला मान देत, पण तो लोकप्रिय मात्र नव्हता. रिपब्लिक पक्षातील फुटीमुळेच तो निवडून आला. व्हर्जिनियातील 'स्टॉन्टन' या ठिकाणी त्याचा जन्म झाला. त्याचा बाप धर्मगुरू होता. प्रिंस्टन विश्वविद्यालयाचा तो पदवीधर होता. त्याने वकीलीस सुरुवात केली, पण पुढे तो व्यवसाय सोडून त्याने लेखन व शिक्षण यात मन घातले. प्रिंस्टन विश्वविद्यालयाच्या अध्यक्षपदी तो नियुक्त झाला. लोकशाही तत्त्वांचा विकास करण्याच्या कामी तो रात्रंदिवस झटत असे. बऱ्याच राजकारणी लोकांची मने त्याने आपल्या उद्योगांनी आकर्षित करून घेतली. न्यूजर्सीचा राज्यपाल म्हणून त्याची नियुक्ती झाली आणि यानंतर अमेरिकेचा अठ्ठाविसावा अध्यक्ष म्हणून तो निवडून आला.

सरकारी कामकाजात नीटनीटकेपणा आणण्याची कोशीस त्याने केली. मोठमोठ्या कारखानदारांनी अगर त्यांच्या संघांनी लहानसहान उद्योगधंद्यांच्या मुळावर येऊ नये म्हणूनही त्याने खटपट केली. स्त्रियांना मतदानाचा हक्क त्याने आपल्याच कारकिर्दीत दिला. त्याच्या अध्यक्षपदाच्या दुसऱ्या वर्षातच जागतिक महायुद्धाला सुरुवात झाली.अमेरिकेला युद्धाबाहेर ठेवण्याचा त्याचा निश्चय होता.

दोन वर्षांपर्यंत त्याचे हे धोरण यशस्वी झाले. दुसऱ्या खेपेस तो फिरून अध्यक्षीय निवडणुकीस उभा असता 'विल्सनने आपणास युद्धाबाहेर ठेविले' असा प्रचार त्याच्या वतीने करण्यात येत असे. आणि दुसऱ्या खेपेसही तो निवडून आला. पण त्याच वर्षी अमेरिकेला युद्धात पडणे भाग झाले! घरगुती प्रश्न मागे पडून, विल्सनच्या प्रभावी नेतृत्वाखाली युद्ध जिंकण्यासाठी अमेरिका एक दिलाने झटू लागली.

जर्मनीच्या पराभवाची चिन्हे दिसू लागताच विल्सनने आपली ''चौदा तत्वे'' जाहीर केली. सर्व जगाला मार्गदर्शक म्हणून एक विल्सनच दिसू लागला! शांततेच्या वाटाघाटीसाठी पायाभूत म्हणून मानलेल्या त्याच्या चौदा तत्त्वांच्या प्रती युद्धक्षेत्रात वाटण्यात आल्या आणि श्रमलेल्या सैनिकांनी हत्यारे खाली ठेविली. हां हां म्हणता युद्ध थंडावले! शांतता-तह घडवून आणण्यासाठी फ्रान्समध्ये एक परिषद बोलावण्यात आली. आतापर्यंतची परंपरा मोडून विल्सन व्हर्साय येथे येऊन दाखल झाला.

विल्सन आपल्या चौदा मुद्द्यांसाठी परिषदेत खूप झगडला, पण विजयी राष्ट्रांतील मतभेदांमुळे त्याची डाळ शिजेना. तडजोडीवर तडजोडी त्याला मान्य कराव्या लागल्या. राष्ट्रसंघाची कल्पना उचलून धरण्यापुरते यश कसेबसे त्याच्या पदरी पडले! सात महिन्यानंतर तहनाम्याचा मसुदा घेऊन विल्सन मायदेशी आला, पण त्याला बिकट परिस्थितीला तोंड द्यावे लागले. त्याच्या गैरहजेरीत त्याच्या विरोधकांनी बस्तान बसविले होते. सीनेटने व्हर्सायचा तह फेटाळून लावला व राष्ट्रसंघाचे सभासदत्व पत्करण्यास नकार दिला. झालेल्या पराभवाने व फसवणुकीने विल्सन खचला, आजारी पडला, व एकांतवासात मरण पावला! त्याची राष्ट्रसंघाची कल्पना आज युनोच्या रूपाने साकार झाली आहे.

●●●

**वॉरन हार्डिंज : 'स्वास्थ्याकडे'**
१९२१ ते १९२३

युद्धसमाप्तीनंतर अमेरिकन जनतेला शांतता व स्वास्थ्य याशिवाय कशाचीच जरूर नव्हती. युद्धाची आठवणही तिला नको होती. युद्धकालीन निर्बंध नको होते. विल्सनच्या बरोबर विरुद्ध धोरणाचा माणूस तिने अध्यक्ष म्हणून पसंत केला. 'परत स्वास्थ्याकडे!' ही त्याची निवडणूक घोषणा होती. हा माणूस म्हणजेच एकोणतिसावा अध्यक्ष वॉरन हार्डिंज!

अध्यक्षीय शपथविधीसाठी राजधानीकडे मोटरने जाणारा हा पहिला अध्यक्ष! हार्डिंजच्या कारकिर्दीत राजधानी वॉशिंटनमधील लोक मोठ्या स्वास्थ्यात व मजेत होते!

हार्डिंजचा जन्म ओहिओमधील मारो परगण्यात झाला. त्याचा बाप शेती व गावठी वैद्यकी करीत असे. मॅरिऑन येथे त्याचे शालेय शिक्षण पुरे झाले. वृत्तपत्रीय जीवनाबद्दल त्याला भलतेच आकर्षण वाटे! काही काळ वार्ताहर म्हणून त्याने काम केले. एकोणिसाव्या वर्षी एका डबघाईला आलेल्या वृत्तपत्राची मालकी त्याच्याकडे आली. 'मॅरिऑन स्टार' हेच ते वृत्तपत्र! पुढे त्याच्या या पत्राचा जम बरा बसला. हार्डिंज सहजसुलभ भाषणे करी, राजकारणात मन घाली, राजकारणी लोकांच्या ओळखी करून घेई! आपल्या संस्थानचा दुय्यम राज्यपाल होण्याची संधी त्याला मिळाली. पुढे तो सीनेटचा सभासद झाला.

त्याच्या कारकिर्दीत वॉशिंग्टन येथे इंग्लंड, जपान व अमेरिका या राष्ट्रांची बैठक भरून शांततेसाठी शस्त्रकपातीची योजना चर्चिण्यात आली. अमेरिकेने लढाऊ नौका मर्यादित करण्यास संमती दिली, पण जपानने मोडता घातला. हार्डिंज भिडस्त व फाजील विश्वास टाकणारा होता. त्याच्या वशिल्याने मोक्याच्या जागेवर आलेल्या इष्ट-मित्रांनी त्याचा विश्वासघात केला व त्याच्याविरुद्ध अफवांचे रान उठविले. पण या संकटाला टक्कर देण्यास तो जिवंतच राहिला नाही. अध्यक्षीय पदाची जबाबदारी पेलण्यास तो मुळीच समर्थ नव्हता!

●●●

**कॉलव्हिन कूलीज : 'यांकी अध्यक्ष'**
१९२३ ते १९२९

उपाध्यक्ष कूलीज आपल्या बापाच्या व्हरमांट टेकड्यांमधील शेतीवर सुटीसाठी गेला होता. तेथेच त्याला अध्यक्ष हार्डिंज याच्या मृत्यूची वार्ता कळली. तार रात्री आली व मुलाला झोपेतून उठवून बापाने ती त्याच्या हाती दिली. नंतर काही तासांतच कूलीज वॉशिंग्टनला जाण्यास निघाला.

कूलीज साधासुधा, मितभाषणी व प्रामाणिक मनुष्य होता. त्याला राजकारणाचा चांगला अनुभव होता. नगरसमितीच्या सभासदत्वापासून तो क्रमश: पुढे पुढे सरकत आला होता. मॅसॅच्युसेट्सचे राज्यपालपद व शेवटी अमेरिकेचे अध्यक्षपद त्याच्याकडे आले.

कॉलव्हिन कूलीजचा जन्म प्लीमाऊथ येथे झाला होता. त्याचा बाप शेतकरी असून त्याचे लहानसे दुकानही होते. लहानपणीच आई वारल्याने बापाच्या करड्या अमलाखाली त्याची वाढ झाली. यथास्थित राबणूक व मायेचा अभाव असेच त्याचे सर्व लहानपण गेले. पण तशातही ॲमहर्स्ट विश्वविद्यालयातून त्याने पदवीपरीक्षा दिली. पुढे कायद्याचा अभ्यासही त्याने पुरा केला व राजकारणात मन घालण्यास सुरुवात केली. एक दिवस अध्यक्षीय भवनापर्यंत त्याने मजल मारली!

अध्यक्षपदी येताच राज्ययंत्रणा सुरळीत करण्याचे काम त्याने हाती घेतले. अप्रामाणिक लोक कामावरून

दूर करून काटकसरीचे धोरण स्वीकारले. प्राप्तीकर कमी केला. परदेशी व्यापाराला व विमानांच्या कारखान्यांना उत्तेजन दिले. पहिली मुदत संपताच तो फिरून अध्यक्षीय निवडणुकीस उभा राहिला व निवडून आला. शपथविधीनंतर त्याने केलेले पहिले भाषण अमेरिकन नागरिकांनी घरोघर रेडिओवरून ऐकले. टेलिफोन, रेडिओ, मोटर, इत्यादी साधने आता घरोघरी आली होती. अमेरिकेची भरभराट चालू होती.

लिंडबर्गने एका दमात अटलांटिक महासागर ओलांडून विमान उड्डाणात विक्रम केला, क्रांती केली! एका इंजिनवर चालणाऱ्या आपल्या विमानाने त्याने न्यूयॉर्क ते पॅरिस प्रवास एकाच झेपेत पुरा केला. कूलीजच्या काळातील अमेरिकेची भरभराट अविस्मरणीय आहे. फिरून त्याने निवडणुकीला उभे राहावे अशी जनतेची इच्छा होती, पण १९२८मध्येच त्याने आपण निवडणुकीस उभा राहाणार नसल्याचे जाहीर करून राष्ट्राला विस्मयात टाकले. तो गाजावाजा न करता अधिकारपदावर आला व त्याच तऱ्हेने निवृत्त झाला. अध्यक्षीय पद सोडल्यानंतर पुढे चारच वर्षांनी तो मरण पावला.

●●●

## अर्बर्ट हूवर : 'निस्वार्थी अध्यक्ष'
१९२९ ते १९३३

कूलीजचा भरभराटीचा कालखंड चालू असताच हर्बर्ट हूवरची अध्यक्षपदी निवड झाली. हूवर यशस्वी उद्योगपती, खाणकाम यंत्रज्ञ म्हणून प्रसिद्ध होता. त्याच्या निवडणुकीच्या वेळी सर्वत्र आशावाद, भरभराट यांचे उत्साही वातावरण दिसत होते. नव्या अध्यक्षाकडून घरोघर 'मुरगी आणि मोटार'चे युग चालू होणार अशी प्रत्येकाची समजूत होती. पण या भरभराटीच्या पोटात अध:पाताचे बी रूजू लागले होते. सट्टेबाजीचा सुळसुळाट झाला होता. शेतीमालाच्या किंमती भरमसाठ घसरल्याने शेतकरीवर्ग चिंतातुर होता.

हर्बर्ट हूवरचा जन्म आयोवाच्या गवताळ प्रदेशातील वेस्टब्रँच या ठिकाणी एका क्वेकर पंथीयाच्या घरी झाला. साधी राहणी, उच्च विचारसरणी व प्रामाणिकपणा हे या पंथीयांचे जीवनसर्वस्व! हर्बर्टचे माता-पिता त्याच्या वयाच्या आठव्या वर्षीच त्याला सोडून गेले! चौदाव्या वर्षी ओरेगॉन येथील आपल्या चुलत्याकडे तो आश्रयासाठी आला. लहानपणापासून त्याला धातुमिश्रित दगडाचे नमुने गोळा करण्याचा नाद होता. कॅलिफोर्नियातील एका विश्वविद्यालयात त्याने खाणकामतंत्राचा अभ्यासक्रम पुरा केला व पदवी घेतली.

नेव्हाडा येथील खाणीत त्याने स्वत: कुदळफावडे घेऊन काम केले व अल्पावधीत खाणकामातील तज्ज्ञ म्हणून जगभर त्याची प्रसिद्धी झाली. ऑस्ट्रेलिया, चीन वगैरे देशांतून त्याला खाणीविषयक सल्ला देण्यासाठी आमंत्रणे आली व या धंद्यावर त्याने खूपच पैसा मिळविला. जागतिक युद्धाच्या सुरुवातीच्या वेळी तो लंडनमध्ये होता. तेथील भयग्रस्त अमेरिकन लोकांना देशाकडे रवाना करण्यासाठी त्याने सर्व प्रकारची मदत केली.

भुकेकंगाल बेल्जियमचा सर्वनाश टाळण्यासाठीही त्याने खटपट केली. विल्सनच्या कारकिर्दीत अन्नखाते त्याने सांभाळले व युरोपमध्ये लढणाऱ्या सैनिकांची उपासमार काडीमात्र होऊ दिली नाही. एक निधी उभा करून युरोपमधील असंख्य मुलांचेही प्राण त्याने वाचविले.

अध्यक्षीय निवडणुकीनंतर सातच महिन्यांनी आर्थिक मंदीचा टोला अमेरिकेला बसला! मंदीला थोपवून धरून फिरून भरभराट आणण्यासाठी हूवरने अनेक लटपटी खटपटी केल्या! पण सर्व जगालाच मंदीने ग्रासल्याने इलाज चालेना. युरोपचा आर्थिक नाश टाळण्यासाठी त्याने

युरोपियन राष्ट्रांकडून येणारे युद्धकर्जाचे हप्ते एक वर्ष स्थगित केले. त्याची मुदत संपण्याच्या सुमारास सरकारी कर्जयोजना चालू होऊनही परिस्थिती सुधारली नव्हती. लाखो लोक बेकार होते. लाखो सरकारी भत्त्यांवर जगत होते. घाबरलेले राष्ट्र दुसऱ्या नेत्याची अपेक्षा करू लागले. फ्रँक्लिन दलनो रूझवेल्ट अध्यक्षपदी निवडून आला. हूवर नंतरही राजकारणात मन घालीत होताच!

●●●

**फ्रँक्लिन डी. रूझवेल्ट : 'नवी योजना'**
१९३३ ते १९४५

मंदीच्या जबरदस्त तडाख्याने बेजार झालेले राष्ट्र मोठ्या आशेने रूझवेल्टकडे वळले. रुंद छातीचा, आनंदी, उत्साही, असा बत्तिसावा अध्यक्ष रूझवेल्ट पुरोगामी विचारसरणीचा होता. त्याच्याजवळ नव्या नव्या योजना होत्या. त्याला जबरदस्त आत्मविश्वास होता. जनता निष्कारण भ्याली आहे, भीती हीच तिची खरी भीती आहे हे त्याने झपाट्यालाच सांगून जनतेत विश्वास निर्माण केला. अध्यक्षीय भवनात प्रवेश करण्यापूर्वी बारा वर्षे, त्याला अर्धांगवायूचा एक झटका येऊन गेला होता. त्यात त्याचा एक पाय अधू झाला होता, आधाराशिवाय त्याला उभे राहाता येत नसे, कुबडीशिवाय चालता येत नसे!

फ्रँक्लिन डी. रूझवेल्ट हा थिओडर रूझवेल्टचा दूरचा नातलग. त्याचे घराणे श्रीमान् होते, सुसंस्कृत होते. न्यूयॉर्कमधील हाइड पार्क विभागात त्याचा जन्म झाला. खाजगी शिक्षकांच्या देखरेखीखाली त्याचा प्राथमिक अभ्यास झाला. त्याला घोड्यांची आवड होती. समुद्र आणि खलाशी जीवन यांचेही आकर्षण त्याला होते.

कोलंबिया विश्वविद्यालयातून त्याने कायद्याचा अभ्यास पुरा केला व न्यूयॉर्कमध्ये वकिलीच्या धंद्यात प्रवेश केला. सीनेटचे सभासदत्व मिळवून त्याने आपल्या राजकीय जीवनाला सुरुवात केली. आरमार खात्याचा दुय्यम कार्यवाह व न्यूयॉर्कचा राज्यपाल म्हणून काही काळ त्याने काम केले. अध्यक्षीय उमेदवार म्हणून त्याची निवड होताच अल्बानीहून शिकागोला तो आपले प्रथम भाषण करण्यासाठी विमानाने आला.

अध्यक्षीय भवनात पदार्पण करताच तो नेटाने व दृढनिश्चयाने कामास लागला. दुसऱ्याच दिवशी त्याने, ज्यांचे व्यवहार सुदृढ पायावर होते अशा पेढ्या वगळून इतर पेढ्यांचे व्यवहार एकदम स्थगित केले. सुवर्णचलनाचा त्याग केला व मदतकार्यासाठी कोट्यवधी डॉलर्स मंजूर केले. नव्या योजना हाती घेऊन लाखो बेकार लोकांना कामधंदा मिळवून देण्याचा चंग बांधला. रेडिओवरून शिळोप्याच्या गप्पांच्या रूपाने जनतेत विश्वास निर्माण करणारी भाषणे चालू केली.

रूझवेल्टच्या नव्या योजनेच्या मागे सारे राष्ट्र उभे राहिले. लागोपाठ तीन वेळा जनतेने त्याला निवडून दिले. अमेरिकेच्या इतिहासातील ही अद्भुत घटना होती. लागोपाठ तीन वेळा अध्यक्षपद मिळविण्याचा मान एकट्या रूझवेल्टच्याच वाट्याला आला. तिसऱ्या निवडणुकीच्या वेळी दुसरे महायुद्ध चालू झाले होते. इंग्लंड-फ्रान्स-जर्मनी-इटलीशी प्राणपणाने लढत होते. 'उधार उसनवार' कायदा मंजूर करून रूझवेल्टने जर्मनी-इटलीशी लढणाऱ्या राष्ट्रांना अमर्याद युद्धसामग्रीचा पुरवठा चालू केला.

अमेरिका अद्यापि युद्धात पडली नव्हती. पण जपानने हवाई बेटांवरील अमेरिकेच्या नाविक तळावर अचानक हल्ला चढवून अमर्याद हानी केली. नाइलाजाने अमेरिकेने जपानबरोबर युद्ध पुकारले. तेव्हा इटली-जर्मनीने अमेरिकेविरुद्ध युद्ध जाहीर केले.

रूझवेल्टला अमर्याद अधिकार राष्ट्राने बहाल केले व युद्धात विजय मिळविण्याच्या ईर्ष्येने तो कामाला लागला.

प्रथम जर्मनीचा व नंतर जपानचा पराभव अशी आखणी त्याने केली. बोटीने, विमानाने प्रवास करून त्याने कैरो, तेहरान व याल्टा या ठिकाणी जर्मनीबरोबर लढणाऱ्या राष्ट्रांच्या प्रमुखांच्या गाठीभेटी घेतल्या. महत्वाचे निर्णय केले. युद्धाचा शेवट दृष्टीपथात आला आणि रूझवेल्टची फिरून चौथ्यांदा अध्यक्षपदी निवड झाली. राष्ट्राराष्ट्रातील युद्धाची भीती समूळ नष्ट करण्यासाठी 'संयुक्त राष्ट्र संघटना' अस्तित्वात आणावी म्हणून त्याचे परिश्रम चालू होते. पण या अचाट परिश्रमांनी त्याचे शरीर पोखरले गेले होते. जॉर्जियातील आपल्या विश्रांतीस्थानी एकाएकी तो मरण पावला.

अमेरिकेच्या खंबीर अध्यक्षांत रूझवेल्टची प्रथम श्रेणी आहे. लोककल्याणकारी सरकार कसे असावे व कसे निर्माण करावे हे त्यानेच दाखवून दिले.

●●●

## हॅरी एस्. ट्रूमन : 'मिसुरीचा माणूस'

१९४५ ते १९५३

रूझवेल्ट चौथ्यांदा निवडून आला त्यावेळी मिसुरीचा सीनेट सभासद हॅरी एस्.ट्रूमन याची उपाध्यक्ष म्हणून निवड झाली होती. चार महिन्यांनतर रूझवेल्ट मरण पावला व उपाध्यक्षाला अध्यक्षपदाची सूत्रे हाती घ्यावी लागली. त्याने रूझवेल्टचे 'नवे धोरण' पुढे चालू ठेवण्याचे आश्वासन राष्ट्राला दिले.

नवा अध्यक्ष कसलेला मुत्सद्दी होता. तो उत्साही होता व मित्र परिवाराशी एकनिष्ठ होता. जनतेवर त्याचे प्रेम होते. मिसूरीमधील लामार या गावी त्याचा जन्म झाला. दृष्टीदोषामुळे त्याला प्रथम लष्करी शाळेत प्रवेश नाकारण्यात आला. लहानपणापासून जाड भिंगाचा चष्मा त्याच्या नाकावर येऊन बसला होता.

आजाच्या शेतीवर काम करीत असताच त्याने लटपटी करून प्रत्यक्ष सैन्यात प्रवेश मिळविला. फ्रान्समध्ये युद्धक्षेत्रावर त्याने तोफखाना विभागात काम केले व कॅप्टनचा हुद्दा मिळविला. युद्धानंतर त्याने दुकानदारी चालू केली पण तीत त्याला यश मिळाले नाही. सैनिकी अधिकाऱ्यांच्या मध्यस्थीने त्याने मिसुरी येथील मुत्सद्द्यांशी ओळखी करून घेतल्या व त्यांच्या साहाय्याने सीनेटचे सभासदत्व मिळवून घेतले. सीनेटचा सभासद या नात्याने राष्ट्र संरक्षण योजना समितीवर काम करण्याची संधी त्याला मिळाली. समितीचा सभासद या नात्याने केलेल्या कामगिरीमुळे त्याला चांगलीच लोकप्रियता मिळाली.

अध्यक्षपदी आल्यानंतर अत्यंत महत्वाचे असे काही निर्णय त्याला करावे लागले. तो अध्यक्षपदी आल्यानंतर पुढे एकाच महिन्यात जर्मनी शरण आला व युरोपातील प्रश्नांचा निकाल लावण्यासाठी ट्रूमन पॉटस्डॅम येथे रवाना झाला. जपानची लढाई तडकाफडकी संपुष्टात आणण्यासाठी अॅटमबॉंबचा वापर करण्याचा अत्यंत गंभीर असा निर्णय त्यानेच केला.

युद्ध संपल्यानंतर घरगुती प्रश्न सोडविण्याकडे ट्रूमनने लक्ष दिले. त्याच्या योजना 'रास्त योजना' म्हणून ओळखल्या जाऊ लागल्या. १९४८ मध्ये रूझवेल्टची आपल्या वाट्यास आलेली कारकीर्द पुरी करून तो स्वत: अध्यक्षीय निवडणुकीस उभा राहिला. जनतेला त्याची झुंझारवृत्ती पसंत असल्याने तो अध्यक्ष म्हणून निवडून आला. पुढील चार वर्षांत कामगारलढे, कोरियांचे युद्ध वगैरे प्रश्नांना त्याला तोंड द्यावे लागले. 'युनो'च्या निशाणाखाली कोरियात लढण्यासाठी अमेरिकन लष्कर त्याने रवाना केले. साम्यवादाला पायबंद घालण्याचा हा त्याचा प्रयत्न होता.

त्याच्या कारकिर्दीत घटनादुरुस्ती करण्यात येऊन कोणीही लागोपाठ दोन वेळापेक्षा अधिक वेळा अध्यक्षपद

उपभोगू नये असे ठरले. उपाध्यक्षपदी असता अध्यक्षपद मिळाल्यास त्या व्यक्तीला पुढे एकच संधी देण्यात यावी. या दुरुस्तीमधून फक्त ट्रूमनला वगळण्यात आले, पण त्यानेच अध्यक्ष म्हणून तिसऱ्या वेळी निवडून येण्यास नकार दिला.

१९५२ मध्ये डेमोक्रॅट पक्षाचा उमेदवार स्टीव्हन्सन याच्यासाठी ट्रूमनने खूपच खटपट व प्रचार केला पण स्टीव्हन्सन निवडून येऊ शकला नाही. वीस वर्षांनंतर रिपब्लिक पक्षाला अध्यक्षपद मिळविण्याची प्रथम संधी मिळाली.

●●●

## ड्विट् डी. आयसनहोअर : 'सेनापती आइक'
१९५३

दुसऱ्या महायुद्धानंतर जगाने शांततेची आशा बाळगली होती, पण १९५२ पर्यंत तरी ती फलद्रूप झाली नव्हती. अद्यापि सर्व जगात अशांत व तंग वातावरण नांदत होते. अमेरिकन राष्ट्राची उभारणी ज्या ध्येयवादावर व तत्त्वांवर झाली होती ती सारीच मागे पडू लागली होती. अमेरिका संकटात होती! अत्यंत कणखर पुढाऱ्याची आवश्यकता तिला होती.अनेक प्रश्नांना तोंड द्यावयाचे होते. अमेरिकन लष्कर कोरियन युद्धात गुंतून पडले होते. सरकारी यंत्रणा अमेरिकन राष्ट्राचे ध्येय म्हणून असलेले धोरण गुंडाळून काम करीत होती. कारभार वाढत होता. 'जीवनमान' वाढले होते. राहणी महागाईची बनत होती. युद्ध व आर्थिक मंदी यांनी निर्माण केलेल्या असंख्य प्रश्नांनी राष्ट्र बैचेन झाले होते. या परिस्थितीत राष्ट्राने जास्तीत जास्त कसोशीने निवड करून आयसनहोअरला चौतिसावे अध्यक्षपद दिले.

टेक्ससमधील 'डेनिसन' या छोट्या गावी आयसनहोअरचा जन्म झाला. तो वर्षाचा असतानाच त्याचे माता-पिता त्याला घेऊन कान्सस येथे राहाण्यास गेले. अत्यंत साधी राहाणी मानणाऱ्या 'रीव्हर ब्रेदरेन' या धर्मपंथाचे हे घराणे अनुयायी असल्याने बालपणापासून आयसनहोअरला कष्ट व प्रामाणिकपणा यांचे शिक्षण मिळाले. लहानपणी भाजीपाला विकून आपल्या कुटुंबाच्या उत्पन्नाला त्याला हातभार लावावा लागे. शालेय शिक्षण संपल्यानंतर एका दुग्धालयात त्याने नोकरी पत्करली.

फुटबॉल खेळाचा तो चांगला शोकीन होता. पुढे 'वेस्ट पॉइंट' येथे विश्वविद्यालय अभ्यासक्रमात असता विद्येप्रमाणे खेळातही तो पुढे आला. पदवीपरीक्षेनंतर त्याने सैनिकांना शिक्षण देण्याचे काम पत्करले. पहिल्या महायुद्धात युद्धक्षेत्रावर जाण्याची त्याने खटपट केली, पण देशात राहूनच सैनिकांना तयार करण्याचे काम त्याला देण्यात आले.

युद्धकालात तो पनामा येथे कामावर होता. पहिल्या व दुसऱ्या महायुद्धाच्या दरम्यान कान्सस येथील लष्करी विद्यापीठाची पदवी परीक्षा त्याने दिली व सेनापती मॅकऑर्थर यांच्याबरोबर सहा वर्षे त्याने फिलिपाईन बेटांवर काम केले. दुसऱ्या महायुद्धाच्या काळात आयसनहोअर ही एक प्रमुख लष्करी व्यक्ती बनली. ब्रिगेडियर जनरलच्या हुद्द्यापासून तो दोस्तांच्या संयुक्त लष्कराच्या सरसेनापती पदापर्यंत झपाट्याने त्याचा दर्जा वाढत गेला. युरोपातील रणभूमीवर त्याने आपल्या नेतृत्वाचे खरे कसब प्रकट करून दोस्तांना विजय मिळवून दिला. युद्धानंतर अध्यक्षपदाची निवडणूक लढविण्यासाठी त्याने आपल्या लष्करी पेशाला रजा दिली, सेवानिवृत्ती पत्करली!

पण फिरून काही दिवसांतच त्याला लष्करी कामगिरीसाठी पाचारण करण्यात आले. उत्तर अटलांटिक करारात (नाटो) सामील झालेल्या राष्ट्रांची लष्करी संघटना उभी करून 'साम्यवादाला' थोपवून धरण्याची योजना आखण्याचे काम त्याला देण्यात आले.

१९४८ साली अध्यक्षीय उमेदवारपदासाठी दोन्ही

पक्षांनी त्याला पाचारण केले होते, पण आपली लष्करी नोकरीच राष्ट्राला अधिक उपयोगी पडेल असे सांगून त्याने या गोष्टीस नकार दिला.

पुढे चार वर्षांनी मात्र अत्यंत लोकाग्रहास्तव त्याने या गोष्टीस संमती दिली. त्याने रिपब्लिक पक्षाचे अनुयायित्व मान्य केले. अत्यंत नेटाने प्रचार करून त्याने रिपब्लिक पक्षाला व स्वत:ला यश मिळवून घेतले. त्याच्या लष्करी कामगिरीबद्दल व कुवतीबद्दल अमेरिकेतच काय पण जगातही कोणाला शंका नव्हती. तो खुल्या दिलाचा, खंबीर व धिमा माणूस म्हणून प्रसिद्ध आहे. त्याचे स्मित सर्वांच्या परिचयाचे आहे. तो शत्रूशी गय करीत नाही, पण त्याच्याशी सूडबुद्धीनेही वागत नाही.

अध्यक्षपदी येताच साऱ्या जगाचे दुखणे होऊन बसलेल्या कोरियांतील युद्धक्षेत्राला त्याने भेट दिली. या प्रश्नाची सविस्तर माहिती खुद्द तेथे जाऊन घेण्याचा त्याचा निश्चय त्याने पार पाडला.

१९५३मध्ये त्याने अध्यक्षीय भवनात प्रवेश केला. या जागेच्या जबाबदारीची संपूर्ण जाणीव त्याला त्यावेळी होती. आपल्या लष्करी ज्ञानाचा उपयोग त्याला आता शांतताप्रस्थापनेच्या कामी करावयाचा होता. एकशे चौसष्ट वर्षांपूर्वी जॉर्ज वॉशिंग्टनने अमेरिकेचा प्रथम अध्यक्ष म्हणून शपथविधी पुरा केला. या चौतिसाव्या अध्यक्षानेही तोच शपथविधी पुरा करून ''अमेरिकन घटनेचे संरक्षण'' करण्याची हमी दिली. प्रत्येक नागरिकाला संपूर्ण स्वातंत्र्याची हमी देण्याच्या कल्पनेवर हे प्रबल राष्ट्र उभे आहे!

●●●